। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १९५ वा । शनिवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## थोडक्यात..

### तीन लाख रुपये किमतीची मोटारसायकल चोरणारा ताब्यात - स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी**: स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चोरीस गेलेली महागडी मोटरसायकल चोरणाऱ्यासह ताब्यात घेत मुंबई येथील कफ परेड पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा उघडकीस आणला आहे. दिनांक २२/१०/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक आरोपींच्या शोधात कार्यरत होते. त्या दरम्यान, दुपारी सुमारे ४.०० वाजता डीमार्ट परिसरात एक व्यक्ती संशयास्पदरीत्या महागडी मोटरसायकल घेऊन फिरत असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यावरून पथकाने मळवटी रोडवर कारवाई केली असता, एक व्यक्ती विना नंबर प्लेटची हार्ले डेविडसन मोटार सायकल घेऊन उभा असल्याचे आढळले. चौकशी केल्यावर त्याचे नाव श्रीधर राजेसाहेब माने, रा. कारेपुर, ता. रेणापुर, जि. लातूर असे असून, मोटरसायकलच्या मालकीविषयी विचारपूस केली असता, त्याने मुंबईतील बी. झेलम बिल्डिंग, नोफरा, कुलाबा येथून दोन दिवसांपूर्वी मोटरसायकल चोरी केली असल्याचे कबूल केले. आधिक तपास केल्यावर, कफ परेड पोलीस ठाण्यात गु.र. क्र. २०७/२०२५, कलम ३०३(२) BNS प्रमाणे हार्ले डेविडसन कंपनीची X-440 मोटरसायकल (मॅट ब्लॅक रंग, क्रमांक 24 BH 7549-) चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधून,आरोपी श्रीधर माने व त्याच्या ताब्यातील मोटरसायकल कफ परेड पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीमध्ये असे स्पष्ट झाले की, आरोपी श्रीधर माने हा गेल्या पंधरा वर्षांपासून भारतीय सैन्य दलात कार्यरत आहे. त्याची नियुक्ती ७५७ ढझढ ट्रान्सपोर्ट प्लाटूनमध्ये आहे. पुढील तपास कफ परेड पोलीस ठाण्याच्या पथकाद्वारे सुरू आहे. सदर कारवाई अमोल तांबे पोलीस अधीक्षक लातूर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शन व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकातील सहाय्यक फौजदार सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार रियाज सौदागर, युवराज गिरी, प्रदीप स्वामी, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख आणि तुराब पठाण यांनी केली आहे.

# संरक्षण व एरोस्पेस उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची आता नवी ओळख - मुख्यमंत्री फडणवीस

### सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस प्रकल्पास मिहानमधील २२३ एकर भूखंडाचे हस्तांतरण



**नागपूर/प्रतिनिधी** : सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस ही भारतातील अग्रगण्य उत्पादक कंपनी नागपूर येथे विस्तार करीत आहे. या अत्याधुनिक संरक्षण व एरोस्पेस उत्पादन प्रकल्पासाठी अटी व शर्तीनुसार मिहानतर्फे २२३ एकर जागेचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

रामगिरी निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात मिहान प्रकल्पातील वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी जमिनीचे हस्तांतरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सोलार कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांना करण्यात आले. याप्रसंगी सोलार ग्रुपचे संचालक मनीष नुवाल, राघव नुवाल, सोलारचे वरिष्ठ अधिकारी जे.एफ साळवे, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे सह व्यवस्थापकीय संचालक तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपश्याम, संजय इंगळे आदी उपस्थित होते.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्या या नव्या विस्तारित प्रकल्पामुळे नागपूरला देशातील प्रमुख संरक्षण व एरोस्पेस उत्पादन केंद्र म्हणून नवी ओळख प्राप्त होणार असल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. हा उपक्रम महाराष्ट्राच्या 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' आणि औद्योगिक प्रगतीच्या विकासासाठी अधिक बळकटी देणारा असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्राच्या विकासासाठी शासनाने घेतलेल्या गुंतवणूकदार-अनुकूल धोरणांचा व अग्रगण्य उद्योगांचा वाढता विश्वास यावरून अधोरेखित होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी भारतात संरक्षण क्षेत्रात सुमारे १२ हजार ८० कोटींची गुंतवणूक करत आहे. नागपूर येथे यातील ६८० कोटी रुपयांची गुंतवणूक करून हा प्रकल्प मिहान मधील विशेष आर्थिक क्षेत्रात साकारला जात आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ४०० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती व सुमारे एक हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.

या प्रकल्पामुळे संरक्षण उत्पादन उद्योग क्षेत्रात नागपूरला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळणार असून विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीत मोठी भर पडणार आहे. महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित असून विविध उद्योजकांना गुंतवणुकीसाठी आकर्षित करणे, प्रादेशिक रोजगारनिर्मिती वाढवणे, संरक्षण व इतर उत्पादन क्षेत्रात राज्याला अव्वल स्थानी नेणे, हे मिहानचे ध्येय असल्याचे एमएडीसीचे सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

# १०२ ॲटोवर कारवाई, ७७,८५० दंड वसूल

### लातूर शहरात बेशिस्त ॲटोरिक्षा चालकांविरुद्ध पोलिसांची विशेष मोहिम

**लातूर/प्रतिनिधी**: लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण आणण्यासाठी आणि बेशिस्त ॲटोरिक्षाचालकांना शिस्त लावण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहिम हाती घेतली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविली जात आहे. शहरातील अनेक ॲटोरिक्षाचालक वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून प्रवासी वाहतूक करत आहेत. काही चालक फ्रंटशिटवर प्रवासी बसवतात, गणवेश परिधान करत नाहीत, तसेच चौकांमध्ये आणि वळणांवर दुहेरी रांगेत रिक्षा उभ्या करून वाहतुकीला अडथळा निर्माण करतात. या बेशिस्त वर्तनामुळे नागरिकांना मोठा त्रास होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्याने ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

२३ ऑक्टोबर २०२५ रोजी लातूर शहरात राबविण्यात आलेल्या या मोहिमेत विविध नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात आली. वाहन चालवताना मोबाइलवर बोलणे, हेल्मेट न वापरणे, कागदपत्रांशिवाय वाहन चालवणे, कर्कश हॉर्न वाजवणे, बेकायदेशीर क्रमांक प्लेट वापरणे, ब्लॅक फिल्म लावणे, मोठ्या आवाजाचे सायलेंसर वापरणे आणि वाहतूक चिन्हांचे उल्लंघन करणे अशा अनेक प्रकरणांत गुन्हे नोंदविण्यात आले. या मोहिमेदरम्यान १०२ ॲटोरिक्षाचालकांवर कारवाई करून एकूण ७७,८५० इतका दंड आकारण्यात आला आहे.

इंटरसेप्टर वाहनाद्वारे ओव्हरस्पीड वाहनांवरही लक्ष ठेवण्यात आले असून, ६९ प्रकरणांत एकूण १.३८ लाख दंड आकारण्यात आला आहे. तसेच ज्या वाहनांचे ई-चलान बाकी आहेत, त्यांच्याविरोधात न्यायालयात खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मुख्य चौकांमध्ये ५० ते ७५ मीटर अंतराच्या आत प्रवासी चढ-उतार करणाऱ्या व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम २८५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी यापुढेही ही मोहीम आणखी तीव्रपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. लातूर जिल्हा पोलीस दलाने नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहन चालविताना सर्व वाहतुकीचे नियम पाळावेत, वाहनाची सर्व कागदपत्रे सोबत ठेवावीत आणि सुरक्षित वाहतूक संस्कृती घडविण्यास सहकार्य करावे.

वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल दराडे यांनी सांगितले की, शिस्तभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई सुरूच राहील. लातूर शहरातील वाहतूक शिस्तबद्ध करण्यासाठी पोलिसांकडून ही मोहीम कायमस्वरूपी राबविली जाणार आहे.

### जम्मू-काश्मीर राज्यसभा निवडणुकीचे निकाल जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जम्मू-काश्मीरमधीलराज्यसभा निवडणुकीचे निकाल आज (२४ ऑक्टोबर) जाहीर झाले. राज्यातील सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स ४ पैकी ३ जागा जिंकल्या, तर भारतीय जनता पक्षाने एका जागेवर विजय मिळवला. नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार चौधरी मोहम्मद रमजान, सज्जाद किचलू आणि शमी ओबेरॉय यांनी निवडणुकीत विजय मिळवला, तर भाजपचे सत शर्मा यांनी जिंकले. चौधरी मोहम्मद रमजान - ५८ मते, सज्जाद किचलू - ५७ मते, गुरुविंदर सिंग उर्फ शम्मी ओबेरॉय - ३१ मते (जम्मू-काश्मीरमधून राज्यसभेत जाणारे पहिले शीख नेते) सत शर्मा - ३२ मते. ही राज्यसभा निवडणूक अतिशय महत्वाची होती. कारण, कलम ३७० रद्द झाल्यानंतरची पहिली राज्यसभा निवडणूक आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू-कश्मीरचा विशेष दर्जा संपुष्टात आल्यानंतर आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांत विभाजन झाल्यानंतर, राज्यसभा निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागलं होते.






ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## गोळा - बेरीजचे राजकारण सुरू...!

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे राजकिय बदलते स्वरूप पाहात अनेक बाबी समोर येत आहेत. वेगळेच राजकिय वातावरण दिसून येत आहे. बिहारमध्ये तर राजकिय रंग आला आहे. काँग्रेस प्रणीत इंडिया आघाडीने लालू प्रसार यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांचे नाव जाहिर केले आहे. बिहारमध्ये गतवेळी प्रचंड यश तेजस्वी यादव यांना मिळाले होते. त्यांना मानणारा वर्ग मोठा आहे. यादव घराण्यातील असले तरी तेजस्वी यांचे प्रतिमा वेगळीच जनसामान्यात आहे. भाजपाला चांगलीच ते फाईट देऊ शकतात. भाजपासाठी आता पर्यंत सहज वाटणारी विधानसेभेची निवडणुक आवघड होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुकीत केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी सुत्रे हाती घेतलीच आहे. त्यापेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट बुथ प्रमुखांची संपर्क साधला आहे. बिहार मध्ये तसे दरवेळा फाईट चांगलीच असते. यावेळी विद्यमान मुख्यमंत्री नितीश कुमार यांना अवघड होणार आहे. भाजपाचा मुख्यमंत्री असेल असे जाहीर केले आहे. बिहारमध्ये भाजपाने पुर्णशक्तीपनाला लावली आहे. यावेळी कोणत्याही परिस्थिती भाजपाचाच मुख्यमंत्री करणार असा चंग बांधला आहे. यदाकदाचित याला यश मिळेल असे दिसून येते. भाजपाने सर्व काही महाराष्ट्रीय पॅटर्न राबवित आहे. यदाकदाचित महाराष्ट्रासारखी राजनितीचा आवलंब होवु शकतो. त्यामुळे बिहारमध्ये सर्व पक्षपनाला लावत आहेत. तसेच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहे. आता दिवाळी पार पडली आहे. शेतकऱ्याच्या खात्यात दिवाळीपुर्वी नुकसान भरपाईची रक्कम जमा होईल असे आश्वासन दिले होते. काहीं शेतकऱ्याच्या खात्यात रक्कम जमा झाली तर अनेकांच्या खात्यात जमा झाली नाही त्यामुळे नाराजीस सत्ताऱ्यास समोरे जावे लागणार आहे. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी तर दिवाळीच पुढे ढकलावी अशी जाहीर मागणी केली आहे. राज्यात विशेष करून मराठवाड्यातील शेतकऱ्यावर संकटाचा डोंगरच कोसळला आहे. त्यासाठी वेगळी मदत निधीची गरज आहे. तरी गरजेची पुर्तता झाली नाही. नुकसान मोठे तर काही शेतकऱ्याच्या खात्यात अल्प मदत पडली आहे. काही मदतीपासून दूर आहे हे योग्य नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पाहात यात सत्ताधाऱ्यांकडे जनता झुकेल असे वाटत नाही. या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत काँग्रेसला बऱ्यापैकी यश मिळेल असा प्राथमिक अंदाज आहे. नुकतेच काँग्रेसे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनजी यांनी शिवसेना उद्धव ठाकरे व मनसे यांच्या सोबत असेल तर स्वतंत्र लढण्याचा जाहिर मनसुबा व्यक्त केला आहे. त्यामुळे काँग्रेसचा विचार जसे काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार मिळूनच निवडणुका लढविण्याचा दिसून येत आहे. ही चाल यदाकदाचित यशस्वी होवू शकते. एकतर लाडक्या बहिणीस न मागता दिडहजारची रक्कत तातडीने खात्यात जमा केली तशी नुकसानग्रस्त शेतकऱ्याच्या खात्यात जमा करणे आवघड नव्हते. दुसरी बाब म्हणजे आज लाडक्या बहिणी बाबत चाळणी लावली जात आहे. न मागता देता नंतर चाळणी लावणे कितपत योग्य आहे याचा विचार सत्ताधाऱ्यांनी केलेला बरा. कारण यामुळे मोठी नाराजकी भोगावी लागणार आहे. काही झाले तरी राज्यात सत्ताधाऱ्यासाठी आवघड असले, तरी विरोधकात एकी नसल्याने सत्ताधाऱ्यास लाभ होण्याची चिन्हे दिसत आहे. एकतर राज व उद्धव ठाकरे एकत्र येणार असे समजले जात असले तरी ते एकत्र आल्याची घोषणा होत नाही. केवळ राऊत बोलत असले तरी जनसामान्यात विश्वास बसणे आवघड आहे. दिपावळी निमित्त दोघे भाऊ एकत्र दिसले असले तरी आगामी मुंबई महानगरपालिकेची निवडणुक डोळ्यासमोर आहे हे जनतेला कळून आले आहे. सत्ताधारी सुद्धा मुंबईत महायुती तर ठाण्यात एकनाथ शिंदे म्हणतील ते होईल असे म्हणत आहेत. एकंदरीत राजकारणात काय चालले आहे हे कळून येणे आवघड आहे. जुनी व अनुभवी यांचा अनुभव त्यांनी जाहीर केला आहे, ते म्हणतात राजकारण हे खरे नसते. एनवेळी पलटी घेणारे राजकारण असते हे महाराष्ट्रातील जनतेला कळून आले आहे. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीचे निकाल सुद्धा आश्चर्यकारक लागतील असे चित्र सध्याला दिसून येत आहे. राजकारण जनतेसाठी असले पाहिजे. स्वार्थासाठी नाही हे ज्यांना कळाले ते राजकारणात यशस्वी होतात. हे ओळखुन चालणारी मंडळी आहे म्हणून काही प्रमाणात राजकारणावर विश्वास आहे. मुळात राज्यात ज्याकाही आलिकडील काळात घडामोडी घडत आहेत किंवा घडल्या आहेत यावरून विरोधकांनी जर जनतेसोबत राहीले तर चांगले दिवस पाहावयास मिळतील. नगरपरिषदा, महानगरपालिका व जिल्हापरिषदातील निकाला ही आगामी विधानसभेची नोंद घेणारी असेल. ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात नारजकी भोवण्याची शक्यता आहे. प्रथम देता नंतर घेता हे योग्य नाही. ज्यांना गरज आहे किंवा आवश्यकता आहे तेथे मात्र आखडता हात घेता हे योग्य नाही. आता यापुढे पक्षाला कमी महत्त्व असणार आहे व व्यक्तीला मते देणारी पिढी निर्माण झाली आहे. आनंदाचा शिधा बंद केला. लाडकी बहिणीस न मागता खात्यात रकमा जमा केल्या, मोठ्या प्रमाणात सप्टेबरच्या पावसाने शेतकरी हा आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाला त्याला मदत नाही तर कोणाला? दिवाळीच्या सणात नाही तर नंतर काय कामाचे? असे विविध प्रश्न हे राजकारण्यास सावध करणारे आहे. याबाबत चिंतन केले पाहिजे. आता काहीही बोलणे किंवा फसवेगिरी चालणार नाही. आता पर्यंत चालले परंतु आता शक्य नाही. त्यामुळे आगामी काळात किंवा बिहारच्या निकालानंतर काही ही परिवर्तन घडू शकते. मुंबई ही मराठी माणसाची आहे. मराठी माणूस कोणाच्या बाजूने झुकला जाईल हे आज सांगता येत नाही मात्र मराठी माणसासाठी काय केले. केवळ राजकरणासाठी वापर केला असेल तर मराठी माणूस परिवर्तनही घडऊ शकतो हे राजकारण्यांनी लक्षात घेतले पाहिजे. केवळ गोळा बेरीजचे राजकारण यापुढे चालणार नाही. तर प्रत्यक्षात काय केले हे पाहुल चालणार आहे. हे केवळ धोक्याची किंवा ईशाऱ्याची घंटा समजा. जनतेचा वापर गोळाबेरीजसाठी होत असेल तर यापुढे शक्य होणार नाही.

# लातूरमध्ये 'दिवाळी संध्या'; राहुल देशपांडे यांच्या सुरांनी उजळली पाडव्याची रात्र

## विलास को-ऑपरेटिव बँकेच्या 'दिवाळी संध्या' कार्यक्रमाला लातूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधीः** दिवाळी पाडव्याच्या शुभसंध्येला सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे यांच्या सुश्राव्य गायनाचा सुरेल सोहळा लातूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात रंगला. विलास को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने बुधवार, २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या या 'दिवाळी संध्या' कार्यक्रमाला लातूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख आणि टवेन्टिवन ग्रीच्या संचालीका अदिती अमित देशमुख यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपावलीच्या पणतींचे प्रज्वलन करण्यात आले. या मान्यवरांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला झळाळी लाभली.






दिवाळी पाडव्याच्या शुभसंध्येला सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे यांच्या सुश्राव्य गायनाचा सुरेल सोहळा रंगला. कार्यक्रमाची सुरुवात 'तुज मागतो मी आता' या गाण्याने केली. त्यानंतर त्यांनी हम तेरे प्यार मे सारा भुल जाए, पाणी रे पाणी हाय नयनो मे भर जाए, सैया तु है मेरा, आप की बातो मे कोई शरारत तो नही, हमको को मिली ऊसकी सजा, विठठल विठठल असे मधुर एका मागोमाग एक गीत सादर केले, ज्याला लातूरकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राहुल देशपांडे यांनी यावेळी शास्त्रीय संगीत, भावगीत आणि गझलांच्या स्वरांनी श्रोत्यांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. त्यांच्या स्वरांमधून पसरलेले रसिकतेचे सुवासिक वातावरण आंबेडकर उद्यानात दरवळत राहिले. दिवाळीच्या या सांगीतिक संध्येला लातूरकरांची प्रचंड उपस्थिती लाभली, ज्यामुळे हा सोहळा संस्कृती आणि उत्सवाचा संगम ठरला.

यावेळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, विलास सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख, डॉ. सविता शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, विलास को-ऑपरेटिव बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हा. चेअरमन समद पटेल, आबासाहेब पाटील, यशवंतराव पाटील, विजय देशमुख, अशोक गोविंदपूरकर यांची उपस्थिती होती.

दिवाळीच्या या सांगीतिक संध्येला लातूरकरांची प्रचंड उपस्थिती लाभली. कुटुंबासह आलेल्या नागरिकांनी उत्साहाने टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक सुरेल प्रस्तुतीचा आस्वाद घेतला. संस्कृती आणि उत्सवाचा संगम घडवणाऱ्या या 'दिवाळी संध्या'ने लातूरकरांच्या दीपोत्सवात आनंदाचे आणि अभिमानाचे नवे सूर फुलवले.

कार्यक्रमास सर्जेराव मोरे, अनंतराव देशमुख, सचिन पाटील, डॉ. कल्याण बरमदे, ऋषिकेश पाटील, गणेश एसआर देशमुख, जितेंद्र सपाटे, राजेंद्र काळे, व्यंकटेश पुरी, सूर्यकांत कातळे, पंडित कावळे, अभय शहा, स्मिता खानापुरे, अरुण कामदार, संभाजी सुळ, सीए प्रकाश कासट, ड. उदय गवारे, सत्तार शेख, प्राचार्य बालाजी वाकुरे, गोविंद देशमुख, आयुब मणियार, धनंजय शेळके, राजा माने, गोटू यादव, विष्णुदास धायगुडे, पप्पू घोलप, पिंटू साळुंखे, सुपर्ण जगताप, इसरार सगरे, पत्रकार अरुण समुद्रे पत्रकार दीपरत्न निलंगेकर, बसवंतआप्पा भरडे, गंगाधरआप्पा हामने, बाबासाहेब गायकवाड, दगडूआप्पा मिटकरी, गिरीश ब्याळे, विजय गायकवाड, प्रा.प्रवीण कांबळे, विजयकुमार साबदे, सचिन बंडापले, युनूस मोमीन, तबरेज तांबोळी, नागसेन कामेगावकर आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्कृती आणि उत्सवाचा संगम घडवणाऱ्या दिवाळी संध्याने लातूरकरांच्या दीपोत्सवात आनंदाचे आणि अभिमानाचे नवे सूर फुलवले.

# मध्य रेल्वेद्वारे मुंबई - नागपूर दरम्यान अतिरिक्त वातानुकूलित सुपरफास्ट विशेष सेवा चालविण्यात येणार

**मुंबई/प्रतिनिधीः** प्रवाशांच्या सोयीसाठी आणि दिवाळी तसेच छठ उत्सवाच्या काळातील वाढती गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेमार्फत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) आणि नागपूर दरम्यान अतिरिक्त वातानुकूलित सुपरफास्ट विशेष सेवा चालविण्यात येणार आहेत.



तपशील पुढीलप्रमाणे आहेतः

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वातानुकूलित विशेष गाडी

गाडी क्रमांक ०१००५ वातानुकूलित सुपरफास्ट विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २५.१०.२०२५ रोजी ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी दुपारी १५.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१००६ वातानुकूलित सुपरफास्ट विशेष गाडी नागपूर येथून २५.१०.२०२५ रोजी १८.१० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पुढील दिवशी सकाळी ०८.२५ वाजता पोहोचेल.

थांबे: दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा.

संरचना: २० वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे आणि २ जनरेटर व्हॅन.

वरील विशेष, गाड्यांसाठी आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच संकेतस्थळावर www.irctc.co.in सुरू आहे.

या विशेष, गाडीच्या थांब्यांवरील तपशीलवार वेळापत्रकासाठी कृपया http://www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES App डाउनलोड करा

# वाळूची अवैध चोरी; वाहतूक करणारा हायवा टिप्परसह २० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**लातूर/प्रतिनिधीः** जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली लातूर पोलीसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहिती वरून दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री गरुड चौक परिसरात सापळा लावून गौण खनिज (वाळू) ची विनापास परवाना अवैध वाहतूक करणारा टाटा कंपनीचा हायवा टिप्पर (क्रमांक MH 24 AU 3888) ताब्यात घेण्यात आला.

सदर वाहनात सुमारे ०४ ब्रास वाळू (किंमत २०,०००/-) आढळली असून,सदर हायवा टिप्परची किंमत अंदाजे २०,००,०००/- अशी आहे. या प्रमाणे, एकूण २०,२०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१.प्रशांत मुरलीधर बंडेवाड (वय ३४ वर्षे, रा. कोळवाडी, ता. अहमदपूर) - चालक

२.विजयकुमार पाटील (रा. परचंडा, ता. अहमदपूर) - वाहनमालक

वरील दोघांविरुद्ध शासन परवानगीशिवाय वाळूची बेकायदेशीर वाहतूक केल्याप्रकरणी पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक प्रशांत बंडेवाड यास अटक करण्यात आली असून, गुन्ह्याचा पुढील तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील पथकातील पोलीस अंमलदार रामलिंग शिंदे,संजय कांबळे, सूर्यकांत कलमे,तुराब पठाण पाराजी पुठेवाड यांनी केली आहे.

# दिवाळी सणात मनपा मार्फत विशेष स्वच्छता मोहीम

**लातूर/प्रतिनिधीः** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये विविध साहित्य खरेदीचे प्रमाण मोठे असल्याने बाजारपेठा गजबजून गेलेल्या दिसतात. त्यामुळे कच-याच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे दिवाळीच्या कालावधीत वेगवेगळया प्रकारचे फटाके वाजविले जात असल्याने रस्त्यावरील कच-यात लक्षणीय भर पडलेली आढळून येते.



या अनुषंगाने स्वच्छ शहर म्हणून रहावे म्हणून आग्रही असलेले आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानूसार तसेच उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखालील लातूर शहर महानगरपालिका स्वच्छता विभागामार्फत दिपावली सणाच्या कालावधीत शहर स्वच्छतेवर अधिक काटेकोर लक्ष देण्यात आलेले आहे.

या विशेष स्वच्छता मोहीमेमध्ये मुख्य स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता विभागातील २५० कर्मचारी तसेच कंत्राटदार अशोक एंटरप्रायसेस यांचे सर्व कर्मचारी यांचेद्वारा २० ट्रॅक्टर, ४ हायवा, ४ जेसीबी च्या साह्याने ८० ट्रिप ट्रॅक्टर, ६ हायवा ट्रिप द्वारे ६० टन कचरा उचलून वाहतूक करण्यात आला. सदर मोहिमेमध्ये कलीम शेख मुख्य स्वच्छता अधिकारी,रमाकांत पिडगे स्वच्छता विभाग प्रमुख, रवी कांबळे मुख्य स्वच्छता निरीक्षक, डि.एस. सोनवणे मुख्य स्वच्छता निरीक्षक,शिवराज शिंदे मुख्य स्वच्छता निरीक्षक, अक्रम शेख मुख्य स्वच्छता निरीक्षक तसेच सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थीत होते.

सदर मोहिमेमुळे लातूर शहर सकाळी दिवस उजाडण्याच्या आत मॉर्निग वॉक करणा-या नागरिकांनी स्वच्छ रस्ते, चौक पाहून या विशेष स्वच्छता मोहीमेची प्रशंसा केली. महत्वाचे म्हणजे मध्यरात्री व पहाटे ही विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असली तरी दररोज सकाळी होणारी साफसफाई नियमीतपणे सुरु असल्याने समाधानकारक अभिप्राय व्यक्त करण्यात आले.

## श्रीमती सरूबाई बिराजदार यांचे निधन

**निलंगा/प्रतिनिधीः** शहरातील जेष्ठ नागरिक श्रीमती सरूबाई माधवराव बिराजदार यांचे गुरुवार दि. २३ ऑक्टोबर रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवर सायंकाळी ५ वाजता लिंगायत स्मशानभूमी निलंगा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले .यावेळी मित्र, आप्तेष्ट ,नातेवाईक, व्यापारी, शिक्षक, पत्रकार, विविध राजकीय पक्ष संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मयत सरूबाई बिराजदार यांच्या पक्षात दोन विवाहित मुली, तीन मुले, सुना नातवंडे, असा परिवार आहे श्रीमती सरूबाई बिराजदार या शिक्षक, पत्रकार श्रीशैल बिराजदार यांच्या आई होत. शुक्रवारी दि.२४ ऑक्टोबर रोजी सकाळी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी शिक्षक कॉलनी येथील त्यांच्या घरी भेट देऊन



# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने दीपावलीनिमित्त कार्यक्रमास उपस्थित राहून दिल्या शुभेच्छा

**लातूर/प्रतिनिधीः** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित दीपावलीनिमित्त अल्पोपहार (फराळ) कार्यक्रमास उपस्थित राहून सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर रोजी दुपारी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते बाजार समितीच्या वतीने अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले. तसेच, जास्तीत जास्त टॅक्स भरलेल्या व्यापाऱ्यांचा सत्कारही बाजार समितीच्या वतीने करण्यात आला.




यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीने दिवाळी फराळ हा अतिशय स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. वर्षभर काबाडकष्ट केल्यानंतर सणासुदीला एकत्र यावे, एकमेकांना ऐकावे आणि आपल्यातील स्नेह वृद्धिंगत करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. ते पुढे बोलतांना म्हणाले, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या विचाराने लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील बाजार चालतो. या वैचारिक शिदोरीमुळेच लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीला देशात व राज्यात उच्च क्रमांक गाठता आला आहे. लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती ऐतिहासिक बाजारपेठ आहे, हिचे अस्तित्व टिकले पाहिजे. कारण शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त भाव देणारी ही बाजारपेठ आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनिल पडिले, कीर्ती ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अशोक भुतडा, हुकूमचंद कलंत्री, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी सभापती ललितभाई शहा, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, प्रभारी सचिव अरविंद पाटील, सहसचिव सतीश भोसले अशोक अग्रवाल, संचालक सर्वश्री बालाप्रसाद बिदादा, श्रीनिवास शेळके,सचिन सूर्यवंशी, सुधीर गोजमगुंडे, युवराज जाधव, आनंद पवार, अनिल पाटील, प्रा. बालाजी वाघमारे, शिवाजी देशमुख, शिवाजी कांबळे, लक्ष्मण पाटील, अभय शहा, आनंद मालू, तुळशीराम गंभीरे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, आडते, व्यापारी, खरेदीदार, हमाल, मापाडी, गुमास्ता, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

# स्त्रीचाच सन्मान म्हणजेचं कुटुंबाची शान..

फक्त प्रेम, सन्मान आणि आपुलकीचा दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश, प्रेम आणि एकत्रतेचा सण. या दिवशी प्रत्येक घर दिव्यांनी उजळून निघतं, पण खरी रोषणाई होते ती मनांतील ऊब, स्नेह आणि नात्यांतील जिव्हाळ्याने. दिवाळीतील पाडवा हा दिवस विशेष मानला जातो, कारण हा दिवस फक्त 'भाऊबीज'च्या उत्साहात नव्हे तर पति-पत्नीच्या नात्याचा सण म्हणूनही साजरा केला जातो. या दिवशी नवरा आपल्या पत्नीस सन्मान, प्रेम, भेटवस्तू देतो आणि पत्नी नवऱ्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. हा दिवस म्हणजे दोन जीवांमधील नात्याला नव्याने उजाळा देण्याची संधी म्हणूनच, प्रत्येक स्त्रीच्या मनात या दिवशी काही खास, मनापासूनच्या अपेक्षा असतात. त्या फक्त भौतिक नसतात, तर भावनिकही असतात. चला, पाहूया पाडव्या दिवशी महिलांना नवऱ्याकडून कोणत्या अपेक्षा असतात आणि त्या कशा पूर्ण करता येतात.

१. प्रेम, सन्मान आणि ओळखीची अपेक्षा तीला सर्वात मोठी भेट असते ओळख आणि आदराची. संपूर्ण वर्षभर ती घर, नातेसंबंध, मुलं आणि जबाबदाऱ्यांमध्ये गुंतलेली असते. पण या दिवशी तिच्या प्रयत्नांना नवऱ्याने थोडं कौतुकाने ओळख दिली, तू सगळं इतकं सुंदर सांभाळतेस, किंवा तुझ्याशिवाय हे घर असं उजळलं नसतं, एवढं म्हणणंही तिच्यासाठी सोन्याहून पिवळं असतं. या छोट्या क्षणांतच तिला सगळ्या जगाचं सुख सापडतं.

२. विचारपूर्वक दिलेली भेटवस्तू पाडव्या दिवशी भेट देणं ही केवळ परंपरा नाही, तर प्रेम व्यक्त करण्याचा एक सुंदर मार्ग आहे. महिलांना भेटवस्तूच्या किमतीपेक्षा तिच्यामागचा विचार आणि भावना जास्त महत्त्वाच्या वाटतात. तुम्ही तिच्या आवडीचा विचार करून दिलेलं काहीही तिच्यासाठी मौल्यवान ठरतं. उदा, तिच्या आवडीची साडी किंवा डिझायनर ड्रेस, गोल्ड/सिल्व्हर ज्वेलरी, सुगंधी परफ्यूम, हाताने लिहिलेलं प्रेमळ कार्ड, मोगऱ्याचा गजरा, स्पा सेशन किंवा ब्यूटी पार्लर वाऊचर, हॉटेलमध्ये एक रोमँटिक डिनर डेट, दोघांनी एकत्र छोटसं ट्रिप प्लॅन करणं, किंवा घरच्या घरी सजवलेलं कॅन्डललाइट डिनर या सगळ्या भेटवस्तू तिच्या मनात कायमस्वरूपी आठवण बनतात. कारण भेट म्हणजे वस्तू नव्हे, त्या क्षणात गुंफलेलं प्रेम असतं.



३. संवाद आणि एकत्र वेळ घालवणं आजच्या धकाधकीच्या आयुष्यात संवाद हा सर्वात मौल्यवान गिफ्ट ठरतो. महिलांना पाडव्या दिवशी नवऱ्याकडून सर्वात जास्त अपेक्षा असते एकत्र वेळ घालवण्याची. मोबाईल, काम, आणि बाहेरील जग काही वेळ बाजूला ठेवा आणि फक्त तिच्यासोबत वेळ घालवा. एक कप चहा घेऊन गप्पा मारणं, जुनी आठवण काढणं, हसणं, फोटो पाहणं हे क्षण तिच्या मनात कायमस्वरूपी साठतात. कारण स्त्रीला साथ हवी असते हाच शब्दांपेक्षा मौनातला आधार असतो.

४. कृतज्ञतेची भावना आणि थोडं सहकार्य दिवाळीच्या तयारीत घरातली प्रत्येक स्त्री दिवस-रात्र झटत असते. साफसफाई, सजावट, फराळ सगळं तिच्यामुळे शक्य होतं. म्हणूनच पाडव्या दिवशी नवऱ्याने तिच्या मेहनतीचं कौतुक करणं. याचबरोबर घरकामात थोडी मदत करणं, उदा. फराळ मांडायला हात देणं किंवा तिच्यासोबत दिवे लावणं ही छोटीशी कृती तिच्या मनात आदराची भावना वाढवते.

५. भावनिक आधार आणि ऐकून घेण्याची सवय कधी कधी स्त्रीला भेटवस्तूंपेक्षा नवऱ्याच्या भावनिक उपस्थितीची गरज असते. फक्त तिच्या भावना ऐकून घेणं, तिचं मन समजून घेणं इतकंच पुरेसं असतं. त्या दिवशी काही क्षण तिच्या जवळ शांत बसणं, तिचा हात हातात घेणं, किंवा मी तुझ्यासोबत आहे एवढं म्हणणंही तिच्यासाठी शब्दांपलीकडचं सुख असतं. पाडवा म्हणजे केवळ भेटवस्तू देण्याचा दिवस नाही तो नातं नव्याने उजळवण्याचा, एकमेकांना समजून घेण्याचा आणि प्रेमाने जोडण्याचा दिवस आहे. स्त्रीला फक्त भेटवस्तू नाही, तर आपुलकी, सन्मान आणि वेळ हवा असतो. या दिवशी तिला जाणवू द्या की ती तुमच्यासाठी किती खास आहे कारण स्त्रीचाच सन्मान म्हणजेचं कुटुंबाची शान...

**- प्राची शिरकर**

# जरूर खा या भाज्या, रहाल निरोगी आणि फिट

**(मागील अंकापासून क्रमशः...)** मदत करते. खाण्याची पद्धत: पराठे, सूप किंवा सलाडमध्ये बारीक चिरून खाऊ शकता. बीट (इशर्शी-ीीं) बीट हे जमिनीखाली वाढणारे कंदमूळ (ठीं तशसशींरलश्रश) असून, ते रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी ओळखले जाते. पोषक घटक: हे फोलेट (त्रेश्ररींश), मँगनीज (चरपसर-पशीश), पोटॅशियम (झेीरीीळीी) आणि नायट्रेट्स (छळीीरींशी) चा चांगला स्रोत आहे. **(क्रमशः पुढील अंकात)...**

आरोग्य फायदे: रक्तशुद्धीकरण: बीट रक्त शुद्ध करते आणि रक्ताभिसरण (इश्रेव उळीलीश्रर-ींळेप) सुधारते. स्टॅमिना वाढवते: नायट्रेट्समुळे शरीराची ऊर्जा आणि स्टॅमिना वाढण्यास मदत होते. रक्तदाब नियंत्रण: उच्च रक्तदाब (कळसह इश्रेव झीर्शीीीश) नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त आहे. खाण्याची पद्धत: सलाडमध्ये किसून, किंवा ज्यूस (गींळलश) स्वरूपात घेऊ शकता. ५. पालक (डळिपरलह) ऑक्टोबरपासून पालकाची उपलब्धता वाढते.



पालक हे एक पौष्टिक शक्तीस्थान (छीीीळ-ींळेपरश्र झेुशीर्हेीश) आहे. पोषक घटक: हे लोह (खीप), व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन के तसेच कॅरोटीनचा (उरीेींशपश) उत्तम स्रोत आहे. आरोग्य फायदे: निमियापासून संरक्षण: लोहामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. डोळ्यांचे आरोग्य: यामध्ये असलेले ल्युटीन (र्ङीींशळप) आणि झेक्सॅन्थिन (नशर्रुरपींहळप) डोळ्यांसाठी खूप फायदेशीर आहेत. हाडे आणि त्वचा: व्हिटॅमिन मकेफ आणि मसीफ मुळे त्वचा आणि हाडे निरोगी राहतात. खाण्याची पद्धत: भाजी, सूप, डाळीत किंवा स्मूदीमध्ये वापरू शकता. ६. भोपळी मिरची (उरीेळिर्ली) / ढोबळी मिरची रंगीत भोपळी मिरची या काळात बाजारात उपलब्ध होते आणि ती रोगप्रतिकारशक्तीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. पोषक घटक: ही व्हिटॅमिन सी चा सर्वात मोठा स्रोत आहे (संत्र्यापेक्षाही जास्त). यात व्हिटॅमिन ए आणि बी६ देखील असते. आरोग्य फायदे: प्रतिकारशक्ती: व्हिटॅमिन मसीफ मुळे रोगप्रतिकारशक्ती तत्काळ वाढण्यास मदत होते, जे हवामान बदलाच्या काळात आवश्यक आहे. पचन आणि चयापचय: चयापचय (चशींरलेश्रळीा) सुधारते आणि पचनास मदत करते. खाण्याची पद्धत: सलाड, पनीर किंवा मशरूमसोबत स्टर-फ्राय (डींळी-षीू) करून किंवा भाजून (ठेरींशव) खाऊ शकता. या हंगामी भाज्या खाल्ल्याने शरीर येणाऱ्या थंडीसाठी तयार होते आणि सर्दी-खोकल्यासारख्या सामान्य आजारांपासून संरक्षण मिळते.

# योगियांची दिवाळी

दीपावलीच्या सर्वांना मंगलमय शुभेच्छा. ही दीपावली सर्वांना आरोग्यदायी आणि मनाला समाधान देणारी असो. दिवाळी हा भारतातील सर्वात मोठा सण. भारताच्या कानाकोपऱ्यांत विविध पद्धतीनं हा सण साजरा केला जातो. सण साजरा करायच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी सगळीकडे आढळणारा या सणातील समान धागा म्हणजे दीपपूजन, दिव्यांची आरास, दिव्यांनी देवांना, तसेच घरातील लहान मुलं, भाऊ, पती यांना ओवाळणं. दिवाळी हा शब्दच मुळी दीप शब्दावरून आला आहे. दीपावली म्हणजे दिव्यांची रांग, दिव्यांची आरास.एकूणच दिवाळी म्हणजे तेजाचा उत्सव. नवरात्र संपलं की आपल्याला दिवाळीचे वेध लागतात. हळूहळू दिवाळीपूर्व कामं सुरू होतात. ज्यामध्ये मुख्य काम असतं ते म्हणजे घर स्वच्छ करणं, घराला रंगरंगोटी करणं, जुन्या वस्तू टाकून देणं, नव्या वस्तूंची खरेदी करणं. एरवी घरात न होणारे फराळाचे पदार्थ विशेष निगुतीनं करणं, दिव्यांची आरास करण्यासाठी घरातील पणत्या, धातूंचे दिवे स्वच्छ करून उजळणं आणि अशी कितीतरी. दिवाळीच्या निमित्तानं केलेल्या या कामांतून जणू काही येणाऱ्या वर्षासाठी आपण घरादाराचं पुनरुज्जीवनच करत असतो.

सख्यांनो, तुम्ही म्हणाल. अहो, आपलं सदर योगविषयक आहे ना? तुम्ही तर दिवाळीचंच वर्णन करताय. आज दीपावलीचं रूपक योजून योगविषय मांडण्याचा प्रयत्न मी करणार आहे. ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वरांनी योग्याच्या दिवाळीचं फार सुंदर वर्णन केलं आहे. ते म्हणतात

मी अविवेकाची काजळी फेडूनी विवेकदीप उजळी। ते योगिया पाही दिवाळी निरंतर।

अविवेकाची काजळी दूर करून विवेकदीप उजळणं ही योगीजनांची निरंतर दीपावली असते. वर मी वर्णन केलंय ते बाह्य दीपावलीचं; परंतु योगीजनांची दीपावली आंतरिक असते. ती कशी? ज्याप्रमाणे दिवाळीच्या आधी घर स्वच्छ केलं जातं त्याप्रमाणेच मन स्वच्छ करणंही तितकंच आवश्यक आहे. आपल्या मनात कोणातरीविषयी असलेला राग, रुसवा असूया, मत्सर, आजच्या जगात विशेषकरून आपल्या मनात असलेली स्पर्धेची भावना, त्यातून आलेली असुरक्षितता, इत्यादी सर्व भावना ही मनावर साठलेली धूळच आहे. याशिवाय नको असलेल्या कितीतरी अनावश्यक चिंता मनात घर करून असतात. त्या पटकन दूर न होणाऱ्या जळमटांसारख्या असतात. घरातील धूळ आपण केरसुणीने काढून टाकतो त्याप्रमाणे मनावर साचलेली ही धूळ, जळमटं, मळ साफ करायचा तर त्यासाठी सकारात्मक भावनांचं फडकं आणि विवेकी विचारांचा साबण हवा. घर स्वच्छ झालं तरी आपल्याला खूप समाधान मिळतं तर मन स्वच्छ झाल्यावर किती आनंद मिळेल याची कल्पना आपल्याला करता येईल.



जुन्या वस्तू टाकून आपण नव्या वस्तू घेतो त्याप्रमाणे निरुपयुक्त विचार दूर करून त्यांची जागा आनंददायी सकस विचारांनी घेतली तर जगाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोनच बदलेल. अशा समाधानकारक भावना आणि विचार मनात आणि बुद्धीत रुजले तर काय बहार येईल? बिनसलेली नवी नाती पुनरुज्जीवित होतील. योग्य विचारांकडे वाटचाल सुरू झाली की अडचणींतून बाहेर पडण्याचे नवे मार्ग दिसू लागतील. समस्यांचं मळभ दूर होऊ लागेल. स्वच्छ घरात जसा अधिक प्रकाश पसरतो. काचेवरची काजळी दूर केली की पारदर्शक काचेतून दिवा जसा अधिक उजळतो आणि त्याचा प्रकाश सर्व दिशांना पडतो त्याप्रमाणे सकारात्मक भावना आणि सकस विचार यांनी भविष्यातील मार्ग उजळून निघतील. स्वयंप्रकाशी दिव्याप्रमाणे आपलं मन आणि बुद्धी आपली आपल्यातच समाधानी शांत आणि आनंदी राहील. बाह्य दिवाळी आपण साजरी करतोच; परंतु ही आंतरिक दिवाळी अधिक महत्त्वाची. कारण नवे कपडे, फराळाचे जिन्नस, फटाके कधीतरी संपणार आहेत; परंतु मनात लागलेला विवेकी विचारांचा दीप मात्र एकदा प्रज्वलित केला तर नित्य तेवत राहील. आपल्या व्यक्तिमत्त्वाला आतून, बाहेरून उजळत राहील. या विवेकदीपाचा प्रकाश नित्य पडत राहील. आपल्याला नेहमीच योग्य मार्ग दाखवत राहील.दीप, प्रकाश ही भारतीय तत्त्वज्ञानानुसार ज्ञानाची आंतरिक जाणीव जागृत झाल्याची, तेजाची प्रतीकं आहेत, तर अंधार, धूर, धूळ ही अज्ञानाची, आपल्या मनावर झालेल्या अनावश्यक संस्कारांची प्रतीकं आहेत. म्हणूनच अभ्यंग स्नान करताना शरीरावरील मळ दूर होतो त्याप्रमाणे विवेकज्ञानानं मनाचा मळही दूर करण्याचा प्रयत्न करणं ही खऱ्या अर्थानं योगदृष्ट्या दीपावली आहे. संस्कृतमध्ये एक वचन आहे आत्मदीपो भव तू स्वतः स्वतःसाठी दीप हो. अंतरीचा ज्ञानदीप उजळणं ही खरी दिवाळी.

**-डॉ. वैशाली दाबके**

## पौष्टिक खा, फिट राहा!



## डॉक्टर टीप्स

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आता-पासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...



स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

**(क्रमशः)**

## विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार

शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.

- कार्लाइल



### संस्कृत सुभाषित

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा:
साात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### सलग दुसऱ्यांदा शून्यावर बाद झालेला कोहली क्रिकेटमधून निवृत्त होणार



**दिल्ली:**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना ॲडलेड येथे सुरू आहे. या सामन्यात तसेच आधी झालेल्या पर्थमधील सामन्यात विराट कोहली शून्य धावा करुन बाद झाला. सलग दोन एकदिवसीय सामन्यात विराट कोहली शून्य धावा करुन बाद झाला.लाग-ोपाठ दोन वेळा अपयशी ठरलेला विराट कोहली कसोटी आणि टी २० पाठोपाठ एकदिवसीयक्रिकेटमधूनही निवृत्ती घेणार असल्याची चर्चा सोशल मीडियात सुरू झाली आहे. विराट कोहली १७ वर्षांच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच लागोपाठच्या दोन एकदिवसीय सामन्यांमध्ये शून्य धावा करुन बाद झाला आहे. ॲडलेडच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज झेवियर बार्टलेटने विराटला बाद केलं. सुरुवा-तीपासूनच कोहली क्रीझवर संघर्ष करताना दिसत होता. त्याच्या खेळात आत्मविश्वासाची कमतरता जाणवत होती. त्यामुळे आता कोहलीसाठी ही मालिका निर्णायक ठरू शकते, कारण भारत सध्या संघ बांधणीच्या टप्प्यात आहे.ज्या ॲडलेडच्या मैदानावर कोहलीने अनेक अविस्मरणीय खेळी केल्या आहेत त्याच ठिकाणी तो अपयशी झाला. सलग दोन 'डक'नंतर विराटला या मालिकेतील शेवटच्या सामन्यात मोठी खेळी करणे गरजेचे आहे, अन्यथा हा नकोसा विक्रम त्याच्या कारकिर्दीवर काळी छाया टाकू शकतो.

***

### स्मृती-प्रतिकाची जोडी जमली, ८६ धावांची भागीदारी रचत भारताला करून दिली चांगली सुरूवात

मुंबई-महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ मध्ये भारत आणि न्यूझीलंड महिला संघांमध्ये आज करो या मरो सामना खेळवला जात आहे. वर्ल्डकप सेमीफायनलच्या दृष्टीने दोन्ही संघांसाठी हा सामना जिंकणं महत्त्वाचं असणार आहे. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडचे संघ आधीच सेमीफायनलसाठी पात्र ठरले आहेत. दरम्यान एका जागेसाठी भारत, न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यात लढत आहे.

स्मृत प्रतिकाची ८६ धावांची भागीदारी

स्मृती मानधना आणि प्रतिका रावल यांनी १६ षटकांत ८६ धावांची भागीदारी रचली आहे. यासह भारताला महत्त्वाच्या सामन्यात चांगली सुरूवातही मिळाली आहे. प्रतिका ७ चौकारांसह ३६ धावा तर स्मृती २ चौकार-२ षटकारांसह ३८ धावा करत खेळत आहे. यादरम्यान प्रतिका रावलने तिच्या वनडेमधील एक हजार धावा पूर्ण केल्या आहेत.

११ षटकांत भारताच्या ५० धावा पूर्ण

भारताने प्रथम फलंदाजी करताना ११ षटकांत ५० धावा केल्या आहेत. स्मृती २४ धावा तर प्रतिका २० धावांवर खेळत आहेत.

५ षटकांत भारताने किती धावा केल्या?

भारताकडून स्मृती मानधना आणि प्रतिका रावल ही जोडी सलामीला उतरली आहे. दोघींनी पहिल्या ५ षटकांत बिनबाद १५ धावा केल्या आहेत. जेस केरने एक मेडन षटक टाकलं. तर प्रतिकाने दोन शानदार चौकार एका षटकात खेचले.

***

### विराटचा नावावर नकोसा विक्रम, १७ वर्षांत असं पहिल्यांदाच घडलं

दिल्ली-भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहली एकही धाव न काढता बाद झाला. मालिकेतील हा सलग दुसरा एकदिवसीय सामना आहे. कोहली शून्यावर बाद झाला आहे. कोहलीच्या फलंदाजीवरून स्पष्ट होते की त्याला क्रीजवर बऱ्याच अडचणी येत आहेत. कोहलीने ॲडलेडसारख्या ठिकाणी खूप धावा केल्या आहेत, परंतु आज त्याच्या शून्यावर बाद झाल्याने चाहत्यांना निराशा झाली. झेवियर बार्टलेटने त्याला बाद केले.ऑस्ट्रेलियाविरुद्ध सलग दुसऱ्यांदा शून्यावर बाद होणे विराट कोहलीसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. या मालिकेत विराट कोहली आणि रोहित शर्माची परीक्षा होईल अशा अफवा आधीच होत्या, परंतु कोहली पूर्णपणे अपयशी ठरत आहे. विराट कोहलीकडे आता या मालिकेत फक्त एक सामना शिल्लक आहे. विराटच्या १७ वर्षांच्या वनडे क्रिकेट कारकिर्दीत हे पहिल्यांदाच घडलं. ज्यामुळे विराटच्या नावावर नकोस रेकॉर्ड नोंदवला गेला आहे. यानंतर, तो सलग महिनाभर एकदिवसीय स्वरूपात खेळताना दिसेल. टीम इंडिया बदलाच्या काळातून जात आहे, त्यामुळे विराट कोहलीला संघात राहायचे असेल तर त्याला धावा कराव्या लागतील.या सामन्यात विराट कोहली शून्य धावांवर बाद झाला, पण तरीही चाहत्यांनी त्याला आदर दाखवला. अ?डलेड ओव्हल हा विराट कोहलीच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याने या मैदानावर लक्षणीय धावा केल्या आहेत, म्हणून जेव्हा तो बाद झाला तेव्हा चाहत्यांनी त्याला उभे राहून टाळ्या वाजवल्या.



## भारताची वर्ल्डकप सेमीफायनलमध्ये धडक

# न्यूझीलंड संघावर मिळवला भारताने दणदणीत विजय

भारत आणि न्यूझीलंड महिला संघांमध्ये वनडे वर्ल्डकप २०२५ मध्ये महत्त्वाचा सामना खेळवला गेला. भारताच्या महिला संघाने न्यूझीलंडचा पराभव करत वनडे विश्वचषक २०२५ च्या सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. टीम इंडियाने न्यूझीलंडचा ५३ धावांनी पराभव केला, स्मृती मानधना व प्रतिका रावलची २१२ धावांची भागीदारी आणि दोघींच्या शतकी खेळी सामन्याच्या विजयात महत्त्वाच्या ठरल्या. यासह ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि भारत हे संघ सेमीफायनलसाठी पात्र ठरले आहे.भारतीय संघाने अटीतटीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना धावांचा डोंगर उभारला. टीम इंडियाने ३ बाद ३४० धावा केल्या, जी भारताची वनडे वर्ल्डकपमधील सर्वात मोठी धावसंख्या आहे. पावसाच्या उपस्थितीमुळे डीएलएस पद्धतीने न्यझीलंडला विजयासाठी ३२५ धावांचं लक्ष्य मिळालं.

पावसाच्या व्यत्ययामुळे सामना ४४ षटकांचा झाल्याने न्यूझीलंडला विजयासाठी ३२५ धावांचं आव्हान देण्यात आलं. प्रत्युत्तरात न्यूझीलंड संघाची सुरूवात चांगली झाली नाही. दुसऱ्याच षटकात सुझी बेट्सला क्रांती गौडने झेलबाद केलं. तर जॉर्जिया प्लाईमर ३० धावा व सोफी डिव्हाईन ६ धावा करत रेणुका सिंगच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाल्या. तर अमेलिया कर ४५ धावांवर स्नेह राणाच्या गोलंदाजीवर बाद झाली. यानंतर श्रीचरणीने ८१ धावांवर खेळत असलेल्या हॅलिडेला झेलबाद केलं. तर मॅडी ग्रीन १८ धावांवर बाद झाली.इसाबेल गेज ६५ धावा करत नाबाद राहिली. भारताकडून रेणुका सिंग ठाकूर व क्रांती गौड यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तर स्नेह राणा, श्रीचरणी, दीप्ती शर्मा व प्रतिका रावल यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

स्मृती मानधनाने मोडला वर्ल्ड रेकॉर्ड, वनडे इतिहासात अशी कामगिरी करणारी ठरली जगा-तील पहिली फलंदाज

न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पण हा निर्णय मात्र भारताच्या पथ्यावर पडला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ३ बाद ३४० धावा केल्या. ही भारताची वनडे वर्ल्डकपमधील सर्वात मोठी धावसंख्या आहे. या धावसंख्येत भारताच्या टॉप फलंदाजी फळीने मोठं योगदान दिलं.

# माझ्या विजयात प्रतिका रावलचाही समान हक्क!

**उपांत्य फेरीसाठी रविवार, २३ ऑक्टोबर रोजी भारत विरूद्ध न्यूझीलंड असा सामना**

स्मृती मानधनाच्या एका वाक्याने चाहते खूश

नवी मुंबई: महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील उपांत्य फेरीसाठी रविवार, २३ ऑक्टोबर रोजी भारत विरूद्ध न्यूझीलंड असा सामना रंगला. ज्यात भारताने ५३ धावांनी न्यूझीलंडचा पराभव करत उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. यामध्ये अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्मृती मानधनाने धमाकेदार फटकेबाजी करत शतक पूर्ण केले. स्मृतीचे हे एकदिवसीय सामन्यातील आतापर्यंतचे १४वे शतक ठरले आहे.

मृतीला यावेळी सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला. पुरस्कार स्वीकारल्यावर तिने आपले मनोगत व्यक्त करताना आपली सहकारी प्रतिका रावलचाही पुरस्कारावर तेवढाच हक्क आहे, असे सांगितले. ज्यामुळे तिच्या या एका वाक्यात तिने पुन्हा एकदा सर्वांच्या हृदयाला हात घातला. यावेळी स्मृती म्हणाली की, भारतीय संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला, याचा सर्वात जास्त आनंद आहे. गेले तीन सामने आमच्यासाठी चांगले गेले नव्हते. चांगले क्रिकेट खेळूनही आम्हाला विजय मिळवता येत नव्हता. पण या सामन्यात मात्र आम्ही चांगली कामगिरी करून विजयी ठरलो. मी या विजयासाठी जेवढी पात्र आहे, तेवढीच प्रतिका रावलही आहे.

महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय!

५३ धावांनी भारताने गाठले उपांत्य फेरीत स्थान

मुंबई: महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय संघाने उपांत्य फेरीसाठी आपली जागा निश्चित केली आहे. विश्वचषकाच्या २४व्या आणि महत्त्वाच्या सामन्यात ...

स्मृतीच्या फटेबाजीमुळे भारताने सामन्याला



जोरदार सुरुवात केली होती. ज्यामुळे क्रिकेटप्रेमींना सामना जिंकण्याची चिन्हे दिसत होती. स्मृतीला गेल्या दोन सामन्यांमध्ये शतकाने हुलकावणी दिली होती. स्मृतीन अनुक्रमे ८० आणि ८८ धावा केल्या होत्या. पण या सामन्यात मात्र स्मृतीने ९५ चेंडूंत १०९ धावांची खेळी करत आपले शतक पूर्ण केले. ज्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत होते. तर क्रिकेट एकदिवसीय सामन्यांत भागीदारीतून सर्वाधिक धावा करणाऱ्या पुरुष आणि महिला क्रिकेटपटूंच्या एकत्र यादीत स्मृती मानधना आणि प्रतिका रावल यांनी दुसरा क्रमांक पटकावला आहे. या यादीत अव्वल क्रमांकावर सचिन तेंडुलकर आणि सौरव गांगुली आहेत.

## बीएसएफच्या इतिहासात पहिल्यांदाच

# पाच महिन्यांच्या सेवेनंतर महिला हवालदाराला बढती

नवी दिल्ली : सीमा सुरक्षा दलाच्या (इडत्र) इतिहासात पहिल्यांदाच पाच महिन्यांच्या सेवेनंतर महिला हवालदाराला (लेडी कॉन्स्टेबल) बढती मिळाली आहे. उत्तर प्रदेशमधील दादरी येथील रहिवासी शिवानी ही एका सुताराची मुलगी असून ती नियुक्तीनंतर एवढ्या कमी कालावधीत बढती मिळवणारी पहिली कॉन्स्टेबल आहे.

शिवानीला ब्राझीलमध्ये झालेल्या १७व्या जागतिक वुशू चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक जिंकल्याबद्दल हेड कॉन्स्टेबल पदावर बढती देण्यात आली. ही बढती बीएसएफचे महासंचालक दलजित सिंग चौधरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. त्यांनी सांगितले की, गृह मंत्रालय आणि डीओपीटीने ठरवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना वेळेआधी पदोन्नतीची तरतूद आहे.

याआधी जुलै २०२५ मध्ये कॉन्स्टेबल अनुज यांनाही चीनमध्ये झालेल्या सांडा वर्ल्ड कपमधील रौप्य पदकासाठी अशीच बढती मिळाली होती.

शिवानी सध्या पंजाबमधील १५५ व्या बटालियनमध्ये कार्यरत आहे. ती दररोज किमान चार तास वुशूचा सराव करते. तिचे पुढचे लक्ष्य वर्ल्ड कपचं सुवर्णपदक आहे.

सीमा सुरक्षा दलाने खेळाडूंना प्रोत्साहन देणारे धोरण तयार केले आहे. या अंतर्गत खेळाडूंना योग्य आहार, उपकरणे, प्रशिक्षक आणि वैद्यकीय सुविधा पुरवल्या जातात. शिवानीच्या यशाने केवळ तिचं नाही, तर संपूर्ण दलाचं मनोबल वाढल्याचे बीएसएफचे महासंचालक दलजित सिंग चौधरी म्हणाले. फक्त पाच महिन्यांत पदोन्नती मिळवणारी शिवानी ही केवळ बीएसएफसाठीच नव्हे तर देशातील सर्व केंद्रीय सशस्त्र दलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.



# २०२६ हिवाळी ऑलिंपिकसाठी अभिनव बिंद्रा मशालवाहक



नवी दिल्ली : पुढील वर्षी होणाऱ्या २०२६ हिवाळी ऑलिंपिकसाठी ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता अभिनव बिंद्राची मशालवाहक म्हणून निवड करण्यात आली आहे. ही क्रीडा स्पर्धा ६ ते २२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान इटलीतील मिलान आणि कोर्टिना डी'अँपेझो येथे होणार आहे.

सोशल मीडियावर आनंद व्यक्त करताना अभिनव बिंद्राने लिहिले की, मिलानो-कॉर्टिना २०२६ ऑलिंपिक मशाल रिलेसाठी मशालवाहक म्हणून निवड होणे खरोखरच सन्मानाची गोष्ट आहे. ऑलिंपिक मशाल नेहमीच माझ्या हृदयाच्या जवळ राहिली आहे - ती स्वप्ने, चिकाटी आणि खे-ळाद्वारे जागतिक एकतेचे प्रतीक आहे. ती पुन्हा घेऊन जाणे हा सन्मान आणि प्रेरणा दोन्ही आहे. या अद्भुत सन्मानाबद्दल मिलानो-कॉर्टिना २०२६ चे आभार. २००८ च्या बीजिंग ऑलिंपिकमध्ये १० मीटर एअर रायफल स्पर्धेत बिंद्राने भारतासाठी सुवर्णपदक जिंकले होते. हे इटलीचे चौथे हिव-ाळी ऑलिंपिक असणार आहे. या हंगामात १६ खेळांमध्ये ११६ पदक स्पर्धा होणार आहेत. आणि हे बीजिंग २०२२ पेक्षा सात जास्त असणार आहेत.

## तुम्ही कितीही मोठे फलंदाज असाल, पण..

# विराट -रोहितच्या फ्लॉप शो वर माजी खेळाडूची लक्षवेधी प्रतिक्रिया

**नवी दिल्ली:** भारतीय संघाचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने विराट कोहली आणि रोहित शर्माबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे. भारताचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला ७ गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला आहे. हा सामना रोहित शर्मा आणि विराट कोहलीसाठी अतिशय महत्वाचा होता. कारण दोन्ही फलंदाज ७ महिन्यानंतर आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी मैदानात उतरले होते. पण दोन्ही फलंदाज पहिल्याच सामन्यात फ्लॉप ठरले आहेत. रोहित शर्मा अवघ्या ८ तर विराट कोहली शून्यावर माघारी परतला. दरम्यान भारताचा माजी फलंदाज मोहम्मद कैफने विराट कोहली आणि रोहित शर्माबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. मोहम्मद कैफच्या मते, विराट कोहली आणि रोहित शर्मानं आधीच ऑस्ट्रेलियाला जायला हवं होतं. दोघांनीही लवकर ऑस्ट्रेलियाला जाणं टाळलं, याबाबत बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, विराट कोहली आणि रोहित शर्माकडे सुवर्णसंधी होती, पण त्यांनी संघासोबत जाणं ठरवलं.



कारण त्यांना माहीत आहे की, लोकं आपल्यासोबत आहेत. विराट इंग्लंडमध्ये होता. त्यामुळे त्याच्यावर दबाव होता. तो जर परस्पर ऑस्ट्रेलियाला निघून गेला असता तर अडचणी वाढल्या असत्या. त्यामुळे तो फसला.

१ जागा अन् ४ संघ शर्यतीत, श्रीलंकेच्या विजयाने बदललं भारताचं सेमीफायनलचं समीकरण; तर न्यूझीलंड; पाहा काय बदल झाला?

विराट आणि रोहितची नेमकी चूक काय झाली? याबाबत बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, या दोघांनीही ८-१० दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाला जायला हवं होतं. तुम्ही कितीही मोठे फलंदाज असाल, पण क्रिकेट हा रिदमचा खेळ आहे. जर तुम्ही पूर्णपणे तयार नसाल तर ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघासमोर तुमचा निभाव लागणार नाही. म्हणून मला वाटतं की, आधी गेले असते तर बरं झालं असतं. रोहित अशा चेंडूवर पूल करून षटकार मारतो.

मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. भारतीय संघाकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना विराट, रोहित आणि गिल हे तिन्ही फलंदाज फ्लॉप ठरले. तर केएल राहुलने ३८ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. या खेळीच्या बळावर २६ षटकांअखेर भारतीय संघाने ९ गडी बाद १३६ धावा केल्या. ऑस्ट्रेलिया डकवर्थ लुईस नियमानुसार १३१ धावा करायच्या होत्या. हे आव्हान ऑस्ट्रेलियाने २२ व्या षटकात पूर्ण करत सामना खिशात घातला.

# ऑस्ट्रेलियाकडून सीरिजमध्ये दारुण पराभव, कॅप्टनने या ३ खेळाडूंवर फोडले पराभवाचे खापर



**दिल्ली**-भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन सामन्यांची वनडे सीरिज खेळवली जात आहे. यातील दुसरा सामना हा एडिलेड येथे खेळवला गेला असून यात ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाचा २ विकेटने पराभव केला. टीम इंडियाने सीरिजमधील सलग दुसरा सामना गमावल्याने ऑस्ट्रेलियाने यात २-० ने विजयी आघाडी घेतली आहे. त्यामुळे रोहित शर्माला कर्णधारपदावरून बाजूला करत भारताच्या वनडे संघाचं कर्णधारपद सोपवलेल्या शुभमन गिलच्या कारकिर्दीची सुरुवात चांगली झाली नाही. तो कर्णधार म्हणून पहिली वनडे सीरिज हरला आहे.

सामन्यापूर्वी झालेला टॉस ऑस्ट्रेलियाने जिंकला आणि त्यांनी प्रथम गोलंदाजी निवडली. टीम इंडियाच्या फलंदाजीची सुरुवात खराब झाली कारण कर्णधार शुभमन गिल आणि विराट कोहली स्वस्तात बाद झाले. मात्र यावेळी श्रेयस अय्यर आणि रोहित शर्मा या दोघांनी तब्बल ११८ धावांची पार्टनरशिप केली.



रोहित शर्माने वनडे करिअरमध्ये ५९ वा अर्धशतक ठोकलं. त्याने ९७ बॉलमध्ये ७३ धाव केल्या. यात २ सिक्स आणि ७ चौकार सामील होते. रोहित शर्मा आऊट झाल्यावर अय्यरने मोर्चा सांभाळला आणि त्याने ७७ बॉलमध्ये ६१ धावा केल्या. अक्षर पटेलने सुद्धा ४४ धावांची खेळी केली. हर्षित राणाने २४ धावा केल्या. टीम इंडियाने ९ विकेट गमावून २६४ धावा केल्या आणि ऑस्ट्रेलियाला विजयासाठी २६५ धावांचे आव्हान दिले.ऑस्ट्रेलियाने विजयाचे आव्हान पूर्ण करताना ८ विकेट गमावल्या पण तरी ४६.२ ओव्हरला त्यांनी २६५ धावांचे आव्हान पूर्ण केले. अर्शदीप सिंह, हर्षित राणा आणि वॉशिंग्टन सुंदर हे प्रत्येकी २ विकेट घेण्यात यशस्वी झाले. तर म ोहम्मद सिराज आणि अक्षर पटेलने १ विकेट घेतली. ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक धावा मॅथ्यू शॉर्ट ने केल्या. त्याने ७४ धावांची खेळी केली.

कोणावर भडकला गिल?

सीरिजमध्ये पराभूत झाल्यावर कर्णधार शुभमन गिलने कॅच सोडणाऱ्या खेळाडूंवर त्याचा राग काढला. तो म्हणाला की इतक्या धावसंख्येनंतर कॅच सोडल्याने जिंकणे सोपे नाही. चौथ्या ओव्हरला नितीश कुमार रेड्डीने अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीवर ट्रॅव्हिस हेडचा कॅच सोडला. त्यानंतर, नितीश कुमारच्या गोलंदाजीवर अक्षर पटेलने १६ व्या ओव्हरच्या चौथ्या चेंडूवर मॅथ्यू शॉर्टचा कॅच सोडला. मोहम्मद सिराजने २९ व्या ओव्हरमध्ये सगळी कसर भरून काढली. वॉशिंग्टन सुंदरने टाकलेल्या पाचव्या चेंडूवर त्याने शॉर्टला बाद केले. ऑस्ट्रेलियाकडून शॉर्टने सर्वाधिक ७४ धावा केल्या, ज्यामध्ये ७८ चेंडूंचा समावेश होता.

शुभमन गिल काय म्हणाला?

शुभमन गिलने म्हटले की, 'आमच्याकडे पुरेशा धावा होत्या. अशा धावांचा बचाव करताना काही संधी (कॅच) गमावणे कधीच सोपे नसते. पहिल्या सामन्यात पावसामुळे नाणेफेक जास्त महत्त्वाची होती, पण या सामन्यात मी जास्त काही बोलणार नाही कारण दोन्ही संघांनी जवळजवळ ५० ओव्हर खेळली. सुरुवातीला खेळपट्टी थोडी जास्त उपयुक्त होती. मला वाटतं १५-२० षटकांनंतर ती चांगली स्थिरावली'.टीम इंडियाची प्लेईंग ११ : रोहित शर्मा, शुभमन गिल (कर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, केएल राहुल (विकेटकिपर), वॉशिंग्टन सुंदर, नितीशकुमार रेड्डी, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, मोहम्मद सिराज

ऑस्ट्रेलियाची प्लेईंग ११ :मिचेल मार्श (कर्णधार), ट्रॅव्हिस हेड, मॅथ्यू शॉर्ट, मॅट रेनशॉ, ॲलेक्स केरी (विकेटकिपर), कूपर कॉनोली, मिशेल ओवेन, झेवियर बार्टलेट, मिशेल स्टार्क, ॲडम झांपा, जोश हेझलवुड.

## लघुदेहत्व : उंची नव्हे, विचारांची परिपूर्णता महत्त्वाची

मानवी जीवनाची खरी ओळख त्याच्या उंचीत, रूपात किंवा बाह्य स्वरूपात नसून, त्याच्या विचारांमध्ये, कर्मात आणि मनाच्या संवेदनशीलतेत असते. पण दुर्दैवाने, जगात आजही अनेक समाजमान्य निकष माणसाची किंमत ठरवतात. उंची, रंग, सौंदर्य किंवा शरीरयष्टी यावरून माणसाचे मोल मोजले जाते. अशाच पूर्वग्रहांचे सर्वाधिक ओझे सोसावे लागते त्या व्यक्तींना, ज्यांना लघुदेहत्व (Dwarfism) ही वैद्यकीय आणि सामाजिक स्थिती लाभलेली असते. त्यांच्या उंचीचा विचार करून समाज त्यांना 'लहान' म्हणतो, पण त्यांच्या मनाचा आणि धैर्याचा विचार केला, तर ते अनेकदा 'महान' ठरतात. दरवर्षी २५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लघुदेहत्व जागरूकता दिन' (International Dwarfism Awareness Day) म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे उद्दिष्ट आहे की, समाजातील सर्व स्तरांमध्ये लघुदेही व्यक्तींविषयी योग्य माहिती पोहोचवणे, त्यांच्या अधिकारांबाबत जागरूकता निर्माण करणे, आणि समाजाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणणे. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, मानवतेची उंची दाखवणारा एक सामाजिक संदेश आहे.

लघुदेहत्व ही एक वैद्यकीयदृष्ट्या ओळखली गेलेली अवस्था आहे. सामान्यतः प्रौढ वयातील उंची चार फूट दहा इंच (सुमारे १४७ सें.मी.) पेक्षा कमी असणे हे लघुदेहत्व मानले जाते. मात्र ही केवळ उंचीची बाब नाही. हाडांच्या वाढीशी संबंधित सुमारे २०० पेक्षा अधिक आनुवंशिक किंवा वैद्यकीय कारणे यामागे असतात. सर्वाधिक सामान्य प्रकार म्हणजे अकॉंड्रोप्लेशिया (Achondroplasia), ज्यात हाडांची वाढ मर्यादित राहते, पण बुद्धिमत्ता व मानसिक क्षमता अबाधित असते. त्यामुळे लघुदेहत्व हे अपूर्णता नसून, एक भिन्न शारीरिक स्थिती आहे. लघुदेहत्वाचे दोन प्रमुख प्रकार मानले जातात, त्यामध्ये प्रथम प्रकार म्हणजे असमप्रमाण लघुदेहत्व, ज्यामध्ये शरीराचे काही भाग प्रमाणात मोठे तर काही लहान असतात; आणि दूसरा प्रकार म्हणजे समप्रमाण लघुदेहत्व, ज्यामध्ये शरीर सर्व अंगांनी लहान असते पण समप्रमाणात असते. या दोन्ही प्रकारांमुळे काही शारीरिक अडचणी जसे की हाडांचे विकार, सांध्यातील वेदना, पाठीचा त्रास किंवा श्वसनाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. तथापि, वैद्यकीय सल्ल्याने, शारीरिक व्यायामाने आणि फिजिओथेरपीने या अडचणींवर नियंत्रण ठेवता येते. यापेक्षा मोठी अडचण असते ती म्हणजे समाजाचा या व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन होय. आजही लघुदेही व्यक्तींना 'छोटे', 'कॉमेडी कॅरेक्टर', 'विदूषक', बुटके, ठेंगणे किंवा 'नवलाईचा विषय' म्हणून पाहिले जाते. मनोरंजन विश्वात त्यांच्या भूमिकांना अनेकदा केवळ हास्याचे साधन बनवले जाते. अशा मानसिकतेमुळे त्यांच्या आत्मसन्मानावर आघात होतो. शारीरिक उंची हा त्यांचा दोष नाही, तरी समाज त्यांच्या आत्मविश्वासाला 'हास्याचा विषय' बनवतो. हे खरे तर मानवी संवेदनशीलतेचे अपयश आहे. कोणत्याही समाजाचा दर्जा त्याच्या तंत्रज्ञानावर नव्हे, तर त्याच्या दयाळूपणावर मोजला जातो. आणि या दृष्टीने पाहिले तर, लघुदेही व्यक्तींविषयीचा आपला दृष्टिकोन अजूनही सुधारण्यास हवा.

या जागरूकता दिनामागे एक प्रेरणादायी इतिहास आहे. २५ ऑक्टोबर हा दिवस निवडण्यात आला कारण याच दिवशी अमेरिकन अभिनेता आणि समाजसेवक बिल बोवेन (Billy Barty) यांचा जन्म झाला होता. त्यांनी १९५७ मध्ये 'Little People of America' या संस्थेची स्थापना करून लघुदेही व्यक्तींच्या हक्कांसाठी आयुष्यभर काम केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावर या विषयाला ओळख आणि सन्मान मिळू लागला. त्याच स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस आज जागतिक चळवळ बनला आहे. भारतातही या क्षेत्रात जागरूकतेचा प्रसार वाढू लागला आहे. Rights of Persons with Disabilities Act, 2016 या कायद्यानुसार लघुदेहत्वाला अपंगत्व म्हणून मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि सार्वजनिक सुविधा यांमध्ये त्यांना समान संधी मिळावी, हे सरकारचे धोरणात्मक दायित्व ठरते. पण कायद्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामाजिक स्वीकार होय. कारण, स्वीकाराशिवाय समानतेचा कायदाही निरर्थक ठरतो.

लघुदेही व्यक्तींना समाजात सर्वाधिक भेदभाव शिक्षण आणि रोजगार क्षेत्रात सहन करावा लागतो. शाळांमधील बाकं, फळे, दारं, स्वच्छतागृहं या सर्व सुविधा सामान्य उंचीच्या लोकांसाठी रचल्या जातात. परिणामी, लघुदेही मुलांना दैनंदिन शालेय व्यवहारात असुविधा भासते. त्याहून गंभीर बाब म्हणजे, अनेक शिक्षक आणि सहाध्यायी त्यांच्या उंचीचा उपहास करतात. यामुळे त्यांच्या आत्मविश्वासावर नकारात्मक परिणाम होतो. शैक्षणिक व्यवस्थेने ही गोष्ट ओळखून समावेशक शिक्षण पद्धती अंगीकारणे गरजेचे आहे, जिथे प्रत्येक विद्यार्थ्याची गरज ही प्रणालीच्या केंद्रस्थानी असेल. रोजगाराच्या क्षेत्रातही ही परिस्थिती फारशी वेगळी नाही. लघुदेही व्यक्तींना अनेकदा अयोग्य समजून नोकरीच्या संधी नाकारल्या जातात, जरी त्यांच्याकडे आवश्यक कौशल्य असले तरी. पण प्रत्यक्षात अशा व्यक्ती बौद्धिक, कलात्मक, व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. फक्त त्यांना संधी आणि स्वीकार आवश्यक आहे. खाजगी क्षेत्रानेही सामाजिक उत्तरदायित्व म्हणून लघुदेही व्यक्तींसाठी अनुकूल कार्यक्षेत्र निर्माण करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर भारतातील काही प्रेरणादायी व्यक्ती समाजासाठी दीपस्तंभ ठरल्या आहेत. नागपूरची ज्योती आमगे ही जगातील सर्वात कमी उंचीची महिला म्हणून ओळखली जाते. तिने तिच्या व्यक्तिमत्त्वाने जगभरात प्रसिद्धी मिळवली आणि आज ती लाखो लोकांसाठी प्रेरणेचा स्रोत बनली आहे. तिच्या एका वाक्याने सर्वकाही सांगितले आहे की 'माझी उंची लहान असली तरी माझी स्वप्ने खूप मोठी आहेत.' अशा उदाहरणांनी समाजाला शिकवले आहे की, उंची नव्हे तर आत्मविश्वास माणसाला मोठे बनवतो. लघुदेही व्यक्तींच्या जीवनात वैद्यकीय उपचारांइतकीच गरज असते ती मानसिक आधाराची आणि सामाजिक समावेशकतेची. समाजाने त्यांना सहानुभूती नव्हे, तर समानतेने सन्मान द्यायला शिकले पाहिजे. माध्यमांनी आणि शिक्षणसंस्थांनी लघुदेहत्वाविषयीची माहिती वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रसारित करावी. चित्रपट, नाटके आणि जाहिरातींनी त्यांच्या जीवनाचा आदरपूर्वक आणि वास्तवदर्शी चित्रण करणे आवश्यक आहे. कारण सांस्कृतिक माध्यमे समाजाची मानसिकता घडवतात, आणि ती बदलण्याची ताकदही त्यांच्यात आहे.

२५ ऑक्टोबर रोजी असणारा 'आंतरराष्ट्रीय लघुदेहत्व जागरूकता दिन' आपल्याला एक संदेश देतो की भिन्नता म्हणजे अपूर्णता नाही. प्रत्येक माणूस अद्वितीय आहे. त्याची उंची, रंग, भाषा किंवा संस्कृती यावरून त्याचे मूल्य ठरवू नये. समाजाने त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला हवा. या दिवशी हिरवा रंग परिधान करणे, हिरवा फिता लावणे, किंवा प्रचार मोहीमा राबवणे हे केवळ प्रतीकात्मक आहे; खरा उत्सव तेव्हाच साजरा होईल, जेव्हा समाजाच्या विचारांमध्ये सहिष्णुतेची, आदराची आणि समानतेची हिरवाई येईल. जगभरात आज विविध संस्था 'ऊळषषशीशपीं, पीं श्रशीीी' हा संदेश देत आहेत. हा संदेश फक्त लघुदेही व्यक्तींनाच नाही, तर सर्वांनाच लागू होतो. कारण प्रत्येकजण काही ना काही प्रकारे वेगळा आहे. भिन्नतेतूनच मानवतेची सुंदरता निर्माण होते. म्हणून समाजाने 'सर्वजण सारखे व्हावेत' हा आग्रह न धरता 'प्रत्येकाला स्वतःसारखे राहू दे' हा दृष्टीकोन स्वीकारायला हवा.

शेवटी असे म्हणता येईल की, उंची ही शरीराची मोजमाप आहे, पण माणुसकी ही आत्म्याची परिपूर्णता आहे. लघुदेही व्यक्तींची संघर्षकथा ही अपंगत्वाची नव्हे, तर साहसाची, आत्मविश्वासाची आणि मानवी आत्मसन्मानाची कहाणी आहे. २५ ऑक्टोबर रोजी साजऱ्या होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय लघुदेहत्व जागरूकता दिनी आपण सर्वांनी एक ठोस संकल्प करू या की, आपल्या शब्दांनी, कृतींनी आणि दृष्टिकोनाने कोणाच्याही मनाला लहान बनवू नये. समाजात अशी विचारांची उंची निर्माण करूया, जिथे माणसाचे मूल्य त्याच्या शरीरावर नव्हे, तर त्याच्या मानवतेवर ठरेल.

– **डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. – ९९६०१०३५८२
ईमेल - bagate.rajendra5gmail.com

## मध्य रेल्वेने सणासुदीच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी
# प्रमुख स्थानकांवर प्रवाशांसाठी प्रतीक्षा क्षेत्रांची व्यवस्था केली

मुंबई/प्रतिनिधी– दिवाळी / छठ पूजा उत्सवानिमित्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या हितासाठी भारतीय रेल्वे एकूण १२०११ विशेष गाड्या चालवत आहे. या उत्सव विशेष गाड्यांमुळे १ कोटीहून अधिक प्रवाशांना प्रवासाची सोय होईल आणि देशभरातील विविध ठिकाणी सोयीस्कर प्रवास पर्याय उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे.



श्री विजय कुमार महाव्यवस्थापक मध्य रेल्वे यांनी माहिती दिली की, मध्य रेल्वे १९९८ दिवाळी विशेष फेऱ्या (आरक्षित आणि अनारक्षित दोन्ही) चालवत आहे, ज्यापैकी ३० लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा देण्यास मदत करतील ज्यामुळे बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश यासारख्या ठिकाणी सोयीस्कर प्रवास पर्याय उपलब्ध होतील.

सध्याच्या सणासुदीच्या काळात प्रवाशांच्या वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी भारतीय रेल्वेने व्यापक व्यवस्था केली आहे. भारतीय रेल्वेच्या १६ झोनमधील ७६ प्रमुख स्थानकांवर प्रभावी गर्दी व्यवस्थापनासाठी विशेष होल्डिंग क्षेत्रे निर्मिती /नियोजित करण्यात आली आहेत.

महाव्यवस्थापकांनी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वे येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस , लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर, पुणे, नाशिक रोड आणि नागपूर या सहा प्रमुख स्थानकांवर होल्डिंग एरियाची तरतूद करून गर्दी व्यवस्थापन सुलभ करण्यावर भर दिला.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे १२०० चौ. मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले,

लोकमान्य टिळक टर्मिनस (ङढढ) येथे एकूण १००००चौ. मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले,

पुणे स्थानकावर २०००चौ. मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले,

नाशिक रोड स्थानकावर १०००चौ. मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले,

नागपूर स्थानकावर १५००चौ. मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले आहे,

या होल्डिंग क्षेत्रांमध्ये एकावेळी सुमारे २०,००० प्रवाशांना थांबण्याची सोय उपलब्ध आहे.

होल्डिंग क्षेत्रांची निर्मिती केल्यासोबतच, प्रभावी गर्दी व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी खालील उपाययोजना केल्या जात आहेत:

छप्परयुक्त शेड, पर्याप्त प्रकाश, वायुवीजन, पिण्याचे पाणी, फॅन्स, शौचालये, चार्जिंग पॉइंट्स, अन्न स्टॉल्स आणि प्रवाशांसाठी घोषणा प्रणालीची सोय करण्यात आली आहे.

प्लॅटफॉर्म्स पूर्वसुसूचितपणे निश्चित करण्यात आले आहेत आणि गाड्यांच्या प्लॅटफॉर्ममध्ये कोणताही बदल केला जात नाही

आयलंड प्लॅटफॉर्मवर दोन गर्दीच्या गाड्या येऊ नयेत याची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे प्रवाशांचा मार्ग मोकळा राहील.

गाड्यांच्या वेळापत्रकासह इतर महत्त्वाची माहिती नियमितपणे जाहीर केली जात आहे.

आरपीएफ कर्मचारी आणि व्यावसायिक कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली प्रवाशांच्या चढण्यासाठी रांग तयार केली जाते.

एआय आणि वॉर रूमच्या मदतीने तिकिटांची उपलब्धता आणि प्रवाशांच्या ट्रेंडचे रिअल-टाइम निरीक्षण केले जात आहे.

प्रवाशांच्या सहाय्यासाठी पुरेशी व्यापारी कर्मचारी आणि तिकीट तपासणी कर्मचारी नेमण्यात आली आहे.

प्रमुख स्थानकांवर सुरक्षिततेसाठी आरपीएफ आणि जीआरपीशी समन्वय राखला जात आहे.

कार्यक्षम व्यवस्था, सुधारित प्रवासी सेवा आणि सुविधा आणि काळजीची वचनबद्धता यासह, मध्य रेल्वे उत्सवाच्या काळात प्रत्येक प्रवाशाला त्याच्या रेल्वे प्रवासादरम्यान चांगली सेवा मिळावी याची खात्री करत आहे.

# मध्य रेल्वे, पंढरपूर येथे कार्तिकी एकादशीला विशेष गाड्या चालवणार

सोलारपूर/प्रतिनिधी–मध्य रेल्वे कार्तिकी एकादशीसाठी पंढरपूर येथे विशेष गाड्या चालवणार आहे जेणेकरून प्रवासी वारकऱ्यांची अतिरिक्त गर्दी कमी होईल.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

मिरज–लातूर अनारक्षित विशेष (२४ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०१४४३ मिरज–लातूर अनारक्षित विशेष ३०.१०.२०२५ ते ०४.११.२०२५ पर्यंत दररोज सकाळी ०७:०० वाजता मिरज येथून निघेल आणि त्याच दिवशी दुपारी ०३:३० वाजता लातूर येथे पोहोचेल. (६ फेऱ्या)

पंढरपूर: आगमन १०:१५, प्रस्थान १०:२०(सकाळी)

– गाडी क्रमांक ०१४४४ लातूर–मिरज अनारक्षित विशेष गाडी ३०.१०.२०२५ ते ०४.११.२०२५ पर्यंत दररोज दुपारी ०४:०० वाजता लातूरहून निघेल आणि त्याच दिवशी रात्री ११:४५ वाजता मिरजला पोहोचेल. (६ फेऱ्या)

पंढरपूर: आगमन ०७:४५, प्रस्थान ०७:५० (सकाळी)

– गाडी क्रमांक ०१४४२ लातूर–मिरज अनारक्षित विशेष गाडी ३०.१०.२०२५ ते ०४.११.२०२५ पर्यंत दररोज सकाळी ०६:०० वाजता लातूरहून निघेल आणि त्याच दिवशी दुपारी ०१:५० वाजता मिरजला पोहोचेल. (६ फेऱ्या )

पंढरपूर: आगमन १०:५५, प्रस्थान ११:००(सकाळी)

– गाडी क्रमांक ०१४४१ मिरज–लातूर अनारक्षित स्पेशल ३०.१०.२०२५ ते ०४.११.२०२५ या कालावधीत दररोज रात्री १०:०० वाजता मिरजहून सुटेल आणि लातूरला दुसऱ्या दिवशी पहाटे ०५:३० वाजता पोहोचेल. (६ फेऱ्या)

पंढरपूर: आगमन ११:५०, प्रस्थान ११:५५ (रात्री)

थांबे: अरग, सलगरे, कवठेमहांकाळ, ढालगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, सांगोला, पंढरपूर, मोडनिंब, कुर्डुवाडी, शेंद्री, बार्शी टाऊन, पांगरी, धाराशिव, येडशी, कळंब रोड, ढोकी, मुरुड, औसा रोड आणि हरंगुळ.

रचना: १० सामान्य द्वितीय श्रेणी/ स्लीपर श्रेणीचे कोच आणि २ सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन. (१२ अनारक्षित कोच)

सोलापूर–मिरज अनारक्षित विशेष (१२ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०१४१९ सोलापूर–मिरज अनारक्षित विशेष ३०.१०.२०२५ ते ०४.११.२०२५ पर्यंत दररोज सकाळी ०७:०० वाजता सोलापूरहून निघेल आणि त्याच दिवशी दुपारी १२:१० वाजता मिरजला पोहोचेल. (६ फेऱ्या)

पंढरपूर: आगमन ०९:२०, प्रस्थान ०९:२५ (सकाळी)

– ट्रेन क्रमांक ०१४२० मिरज–सोलापूर अनारक्षित विशेष ३०.१०.२०२५ ते ०४.११.२०२५ पर्यंत दररोज दुपारी १२:५० वाजता मिरजहून निघेल आणि त्याच दिवशी संध्याकाळी ०७:०० वाजता सोलापूरला पोहोचेल. (६ फेऱ्या)

पंढरपूर: आगमन ०२:५० तास, प्रस्थान ०२:५५ (दुपारी)

थांबे: मोहोळ, माढा, कुर्डूवाडी, मोडनिंब, पंढरपूर, सांगोला, म्हसोबा डोंगरगाव, जत रोड, ढालगाव, कवठे महांकाळ, सलगरे आणि अरग.

रचना: १६ सामान्य द्वितीय श्रेणी/ स्लीपर श्रेणीचे कोच आणि २ सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन. (१८ अनारक्षित कोच)

बुकिंग: अनारक्षित कोचसाठी स्टेशनवरील बुकिंग काउंटर आणि यूटीएस ॲपद्वारे देखील बुकिंग करता येते. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात आली आहे.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या घेतल्या भेटी, दीपावलीच्या दिल्या शुभेच्छा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा, निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या, तसेच सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सूळ, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शहा, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्याम भोसले, ट्वेंटीवन शुगरचे व्हॉ. चेअरमन विजय देशमुख, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, दगडूआप्पा मिटकरी, वीर सकट, हरी कांबळे, सचिन टमके, विठ्ठलराव पाटील, बापूराव देशमुख, सागर वैद्य, डॉ.अशोक पोद्दार, डॉ. लक्ष्मीकांत कर्वा, डॉ.रमेश भराटे, डॉ. चांद पटेल, डॉ.विश्रांत भारती, लक्ष्मण मोरे, एन.एन काझी, लक्ष्मीकांत मंठाळे, शशिकांत मजगे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, पृथ्वीराज शिरसाठ, राजकुमार पाटील, एन.आर पाटील, अनुप शेळके, बसवराज पाटील नागराळकर, स्वयंप्रभा पाटील, सपना किसवे, अशोक गोविंदपुरकर, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, एकनाथ पाटील, नारायण लोखंडे, सिद्धार्थ बनसोडे, प्रशांत पाटील, अग्निवेश शिंदे, आशिष मोदी, जावेद काजी, उमेशराजे निंबाळकर, भरत मलवाडे, सत्यवान कांबळे, राजकुमार जाधव, राजकुमार कत्ते, उदय पाटील, नागनाथ गित्ते, नितीन मंडाळे, संतोष हत्ते, पुष्कराज हेड्डा, धर्मवीर भारती, श्रीकांत हिरमठ, सुरेश पेन्सलवार, नानिक जोधवानी, सुनील कोचेटा, जकीखान कायमखानी, सचिन दाताळ, अमित जाधव, सुंदर पाटील कव्हेकर, कैलास कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, श्रीकांत ठोंबरे, असलम बागवान, इरफान बागवान, जिलानी



बागवान, बादल शेख, प्रताप पाटील, युनुस शेख, मोहन सुरवसे,, रामराजे काळे, सुभाष जाधव, सहदेव मस्के, गोविंद बोराडे, पंडित ढमाले, सचिन बंडापले, शिवदास शिंदे, उमेश बेद्रे, डॉ.बालाजी साळुंखे, बालाजी मुस्कावाड, दिनेश गोजमगुंडे, सतीश हलवाई, आनंद मालू, सुनीता आरळीकर, दीपा आदमाने, अविनाश बट्टेवार आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रकाशराव भूमकर यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील प्रसिद्ध आयुर्वेदिक औषध विक्रेते तथा प्रकाश प्रोव्हिजन संचालक प्रकाशराव रंगनाथराव भूमकर यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ वर्षे होते. स्व. प्रकाशराव भूमकर हे अतिशय मनमिळावू स्वभावाचे आणि धार्मिक वृत्तीचे होते. आपल्याकडे आयुर्वेदिक औषधीसाठी आलेल्या प्रत्येक ग्राहकाला हवी असलेली औषधी उपलब्ध करून देण्याकामी ते कायम आग्रही असत. ते आयुर्वेदाचे चांगले जाणकारही होते. अनेक असाध्य व्याधींवर सोप्या पद्धतीने उपचार कसे करायचे याबाबतीतही मार्गदर्शन करत असत. प्रकृती अगदी व्यवस्थित असताना दि. २१ ऑक्टोबर रोजी पहाटे अडीचच्या सुमारास हृदयविकाराचा तीव्र धक्का बसल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. प्रकाशराव भूमकर यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून – नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# रविवारी वीरशैव लिंगायत समाजबांधव लातूरच्या वतीने राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही राज्यस्तरीय वीरशैव लिंगायत वधू – वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात नावाजला गेलेला विनामूल्य समाजसेवेचा उपक्रम मागच्या १३ वर्षांपासून अविरतपणे चालू आहे. लातूर शहरातील खंडोबा गल्लीमधील वीरशैव समाज सांस्कृतिक भवनमध्ये होणाऱ्या या मेळाव्यास आशीर्वाद देण्यासाठी अहमदपूरचे राजेश्वर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज, पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थानचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, भक्तीस्थळचे गुरुराज महाराज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय शिवा संघटनेचे संस्थापक – राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. शिवाजी काळगे, भाजपचे लातूर जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर, भाजपा नेत्या डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची उपस्थिती राहणार आहे. मेळाव्यास उपस्थित राहणाऱ्या सर्व उप वधू – वर आणि त्यांच्या पालकांसाठी संयोजकांच्या वतीने मोफत सोय करण्यात आली आहे. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही या मेळाव्यामध्ये नाव नोंदणी करणाऱ्या उप वधू – वरांच्या छायाचित्रांसह माहितीपुस्तिकाही प्रकाशित केली जाणार आहे. यावर्षीच्या मेळाव्यास नेहमीप्रमाणे वधू – वरांच्या पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नोंदणीचे उद्दिष्ट्य दोन हजार निश्चित करण्यात आलेले असले तरी प्रत्यक्षात त्याहूनही अधिक उप वधू – वरांच्या नोंदणी होणार असल्याचे मेळाव्यास मिळणाऱ्या प्रतिसादावरून पाहावयास मिळत असल्याचे दिसून येत आहे. मागच्या वर्षीच्या मेळाव्यात १९०० नोंदी झाल्या होत्या. उपस्थित वधू – वरांना एकमेकांना प्रत्यक्षात पाहून, भेटण्याची संधी या निमित्ताने मिळते. रविवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत हा मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शक उमाकांत कोरे, संयोजक अभिषेक (तम्मा) चौंडे, नागेश कानडे, अध्यक्ष बसवराज धाराशिवे, कार्याध्यक्ष राजाभाऊ हालकुडे, विश्वनाथ राचट्टे, स्वागताध्यक्ष दिलीप होनराव, पवनकुमार कल्याणी, उपाध्यक्ष सुनील भिमपुरे, शिवराज बुरांडे, कार्यवाहक बालाजी पिंपळे, बसवेश्वर हालकुडे, सचिव वैभव विभूते, महेश कोळळे, सतीश कानडे यांसह सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# दयानंद विज्ञानच्या माजी विद्यार्थी फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम : खुशीग्राम फाऊंडेशन येथे अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाऊंडेशनच्या वतीने दि.२२ आक्टोंबर २०२५ रोजी मधुकर सोनवणे व वर्षाताई सोनवणे यांच्या खुशीग्राम प्रकल्प फाऊंडेशन येथे अनाथ मुलांच्या सोबत दिवाळी साजरी करण्यात आली.याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे,दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाऊंडेशनचे अध्यक्ष उमाकांत आंग्रे, सचिव संजय ढाले,सतीश नरहरे, डॉ.युवराज सारणीकर, हानमंत गायकवाड, प्रा.बळवंत सूर्यवंशी, विजय किलचे, सुशीलकुमार फुलारी, पुंडलिक इंगळे,इस्ताळकर,पाटे व इतर सर्व पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.खुशी ग्राम फाऊंडेशनचे प्रमुख मधुकर सोनवणे व वर्षाताई सोनवणे या दाम्पत्यांचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांनी कौतुक करताना ते या सर्व अनाथ मुलांचे तुम्हीच विठ्ठल रुक्माई आहात असे गौरवोद्गार काढले. दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाऊंडेशन दरवर्षी दिवाळीमध्ये असा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवितो.सुभेदार रामजी नगर येथील सोनवणे दाम्पत्य हे १६ अनाथ व एकल पालक असलेल्या मुलांचा रिक्षा चालवून सांभाळ करतात.त्यांचे शिक्षण, भोजन व निवासाची सोय स्वतः कष्ट करून करतात.अशा या अनाथ,निराधार व वंचित मुलांच्या आनंदात सामील होणं हीच खरी माणुसकीची दिवाळी आहे.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांचेही नेहमी अशा उपक्रमांस प्रोत्साहन मिळते.माजी विद्यार्थ्यांच्या बैठकीतून चांगले निर्णय घेतात. न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांचे सहकार्य नेहमी मिळते.याप्रसंगी खुशी ग्राम फाऊंडेशनचे सोनवणे दाम्पत्य यांनीही दयानंद विज्ञानच्या माजी विद्यार्थी फाऊंडेशनचे आभार मानले.

# माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांचे भाचे निळकंठराव पवार यांचे अकाली निधन

**लातूर/प्रतिनिधी :** भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचे भाच्चे,लातूर येथील जेएसपीएम शिक्षण संस्थेचे समन्वयक संचालक तथा भारतीय जनता पार्टीचे माजी ग्रामीण जिल्हा सरचटिणीस, जननायक संघटनेचे लातूरजिल्हा कार्याध्यक्ष निळकंठराव पवार यांचे २२ ऑक्टोबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांना उपचारासाठी हैदराबाद येथील ए. जी. रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर लातूर येथील डॉक्टर हलकंचे यांच्या साई हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते दरम्यान २२ ऑक्टोबर रोजी त्यांचे उपचारादरम्यान त्यांचे अकाली निधन झाले. त्यांनी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब यांच्या राजकीय वाटचालीत व जेएसपीएम संस्थेच्या वाटचालीमध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. तसेच त्यांनी महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे सल्लागार समितीचे सदस्य म्हणूनही काम केलेले आहे. त्यांच्या अकाली जाण्यामुळे कव्हेकर व पवार परिवारांचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यांच्या पार्थिवावर चांडेश्वर येथील समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी राज्याचे माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे शहर जिल्हा जिल्हाध्यक्ष अजित पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस संजय शेटे, आदितीताई पाटील कव्हेकर, विश्वजीत पाटील कव्हेकर, सम्राट पाटील कव्हेकर,रंजितसिंह पाटील कव्हेकर, रोहित पाटील गौरकर, संभाजीराव पाटील रावणगावकर, नगरसेविका रागिनीताई यादव, प्राध्यापक सतीश यादव, बापुसाहेब गोरे, प्राचार्य आर. एस. अवस्थी ,लक्ष्मीकांत दौंड, दिलीप पाटील, अशोक पाटील,जननायक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, बाबासाहेब देशमुख,माधवराव गायकवाड,राजाभाऊ मुळे,उध्दवराव जाधव, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोदाआबा जाधव ,माजी नगरसेवक चंद्रकांत चिकटे ,मोहन माने, सुंदर पाटील कव्हेकर, नगरसेवक देवा साळुंके, शिक्षक नेते केशव गंभीरे, संजय गीर, यांच्यासह विविध क्षेत्रातील हजारो नागरिक उपस्थित होते.

# लातूरच्या विकासासाठी अभिमन्यू पवारांचा दमदार पाठपुरावा गडकरींकडून चार महत्त्वाच्या प्रकल्पांना ग्रीन सिग्नल!





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहराच्या वाहतुकीचा चेहरामोहरा बदलवणारा ऐतिहासिक निर्णय (२३) रोजी नागपूरमध्ये घेण्यात आला आहे. देशाचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लातूर शहराबाहेरून जाणाऱ्या ६० किमी लांबीच्या पर्यायी रिंग रोडला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन चौपदरीकरण करण्यास तत्वतः मान्यता दिली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांनी आज नागपूर येथे गडकरी यांची भेट घेऊन दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या आणि जिल्ह्यातील महत्त्वाच्या विकासकामांचा सविस्तर पाठपुरावा केला.

पेठ – चांडेश्वर – कव्हा – बाभळगाव – भातखेडा – खुलगापूर – नांदगाव – रायवाडी – हरंगुळ – खंडापूर – गंगापूर – पेठ या मार्गाने जाणारा ६० किमी लांबीचा पर्यायी रिंग रोड लातूर शहरातील वाढत्या वाहतूककोंडीवर कायमस्वरूपी उपाय ठरणार आहे. या मार्गाला यापूर्वी राज्य मार्गाचा दर्जा देऊन ४८ किमी लांबीचे भूसंपादन पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित १२ किमी भूसंपादनाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश नितिन गडकरींनी बैठकीतूनच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना फोनवरून दिले. राज्य शासनाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर या रिंग रोडला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन चौपदरीकरण करण्याची मंजुरी तात्काळ देण्यात येईल, असा शब्द गडकरींनी लातूरकरांना दिला. या निर्णयामुळे लातूर शहराच्या विकासाला मोठी गती मिळणार असून वाहतूक कोंडीचा कायमस्वरूपी निपटारा होणार आहे.

*आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, औसा मतदारसंघ आणि लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी आजची भेट अतिशय फलदायी ठरली आहे. सर्व प्रकल्प प्रत्यक्षात पूर्णत्वास जाईपर्यंत माझा पाठपुरावा कायम राहील.या भेटीमुळे लातूर शहर आणि परिसरातील वाहतूक, पायाभूत सुविधा आणि विकासकामांना नवी ऊर्जा मिळाली असून जिल्हा आता अधिक सक्षम आणि प्रगत लातूरच्या दिशेने पुढे जात आहे.*

यासोबतच आमदार अभिमन्यू पवार यांनी आशिव पाटी येथे रत्नागिरी–नागपूर महामार्गावर भुयारी मार्ग (Vehicle Underpass) उभारण्याची मागणी केली. आशिव – मातोळा – किल्लारी – जेवरी – नणंद या निळकंठेश्वर मार्गावर वाढत्या वाहतुकीचा आणि आशिव ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून मा. गडकरींनी या कामास मंजुरी देण्याच्या लेखी सूचना संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ दिल्या आहेत.

तेरणा नदीवरील उजनी पुलावर दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचून वाहतूककोंडी निर्माण होते तसेच नालीअभावी शेतकऱ्यांचे नुकसान होते. या पार्श्वभूमीवर पुलाची पुनर्बांधणी व मोठी नाली बांधकामाचे काम यापूर्वीच मंजूर झाले असून या कामाला प्रत्यक्षात पुढील १५ दिवसांत सुरुवात करण्याचे आदेश गडकरींनी दूरध्वनीवरून संबंधित विभागाला दिले आहेत.

लातूर–औसा–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील औसा शहरात होत असलेल्या वाहतूककोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रस्तावित उड्डाणपुलाच्या कामातही गती आली आहे. या उड्डाणपुलाचा डीपीआर तयार करण्यासाठी कन्सल्टंट कंपनी नेमण्यासाठी निविदा काढण्यात आली असून ३० ऑक्टोबर २०२५ ही अंतिम तारीख आहे. डीपीआर, अंदाजपत्रक, तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता प्रक्रिया पूर्ण करून ९ महिन्यांत उड्डाणपुलाचे प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे आश्वासन गडकरींनी दिले आहे. त्यामुळे औसेकरांना अपेक्षित असलेला उड्डाणपूल आता साकाराच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# वसुंधराने साजरी केली पोलिसांसोबत दिवाळी!

**लातूर/प्रतिनिधी :** दिवाळी म्हणजे आनंद, एकत्रता आणि प्रकाशाचा सण. परंतु या प्रकाशाच्या क्षणीही आपल्यासारख्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रात्रंदिवस ड्युटीवर असणारे काही खरे ‘रक्षक’ कायमच जागे असतात – ते म्हणजे आपले पोलिस कर्मचारी. त्यांच्या या निस्वार्थ सेवेला मानाचा मुजरा देण्यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान, लातूर यांच्या वतीने एक हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वसुंधरा प्रतिष्ठानच्या सदस्यांनी लातूर शहरातील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात जाऊन अधिकारी आणि कर्मचारी यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या तसेच मिठाई वाटप करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सणासुदीच्या काळात समाजाचे रक्षण करण्यासाठी आपल्या कुटुंबासोबत सण साजरा करू न शकणाऱ्या पोलिसांप्रती संस्थेने ‘आभार’ व्यक्त करण्याचा हा उपक्रम उबदार भावनेने पार पडला. या उपक्रमात पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, अध्यक्ष डॉ.अजित चिखलीकर, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियान प्रमुख राहुल माशाळकर, लातूर शहराध्यक्ष उमेश आप्पा ब्याकोडे, सदस्य सुग्रीव कांबळे, प्रसाद कुंभार यांच्यासह प्रतिष्ठानचे सदस्य आणि पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुम्ही आहात म्हणून आम्ही आमच्या परिवारासोबत सर्व सण आणि उत्सव सुरक्षित पद्धतीने साजरी करू शकतो असे ग्रीटिंग कार्ड वसुंधरा पदाधिकाऱ्यांनी पोलिसांना यावेळी भेट दिले आणि त्यांच्या अविरत सेवेबद्दल आभार मानले.

या उपक्रमाच्या अनुषंगाने बोलताना वसुंधरा प्रतिष्ठानचे लातूर शहराध्यक्ष उमेश आप्पा ब्याकोडे म्हणाले, वसुंधरा प्रतिष्ठान गेली अनेक वर्षे समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, आणि मानवी मूल्यांचा प्रसार यासाठी कार्यरत आहे. या दिवाळीत ‘माणुसकीची दिवाळी’ साजरी करून सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवले होते. यंदा पोलिस दलासोबत दिवाळी साजरी करून त्यांनी समाजातील आणखी एका महत्त्वाच्या घटकाला सन्मान देण्याचे काम केले. मिठाई वाटपानंतर गप्पा, अनुभवविनिमय आणि आनंदमय वातावरणात हा उपक्रम पार पडला. शहरवासीयांनी या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर स्वागत करत, वसुंधरा प्रतिष्ठानने पोलिसांबद्दल आदर आणि आपुलकी निर्माण करणारे उदाहरण घालून दिले, असे मत व्यक्त केले.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-

मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी

संपर्क

8600025070

9028376965

प्रिंटर्स पॅराडाईस

प्रिंटर रिपेअरिंग

कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस

टोनर रिफिलिंग


# सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत देवंग्रा येथील अनेकांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**चाकूर/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्ववार विश्वास ठेवत तालुक्यातील देवंग्रा येथील ग्रामपंचायतचे आजी –माजी सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे चेअरमन यांच्यासह अनेकांनी राज्याचे सहकार मंत्री मा.ना.बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

गुरुवार दि.२३ ऑक्टोबर रोजी शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थानी चाकूर तालुक्यातील देवंग्रा येथील सरपंच नामदेव शिंगाडे,माजी सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्य मारुतीराव भूत्ते, विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे चेअरमन नामदेव नरवाडे,ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत नरवाडे,शिवाजी वाघमारे,संग्राम नरवाडे,विठ्ठल नरवाडे,अशोक तांदळे, नामदेव जाधव शिवाजी काळे, विजयकुमार गादेवार,राजकुमार जाधव,किशोर नरवाडे, बालाजी बामनकर, जनार्दन नरवाडे, मनोज करवंडे, मोहन जाधव,नरसिंग नरवाडे,गोविंद शिंदे, ब्रह्मदेव नरवाडे, माधव नरवाडे,ज्ञानोबा नरवाडे,सुहास जाधव, गिरधर नरवाडे,शिवाजी चव्हाण, वसंत आडे,गोविंद पारवे,व्यंकटराव जाधव.आदीसह अनेकांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीत पक्षप्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे स्वागत व अभिनंदन सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी चाकूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू तिकटे, युवक तालुकाध्यक्ष संदीप शेटे, ड. संतोष गंभीरे पाटील उपस्थित होते.

## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
### विद्युत काम

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई- खरेदी वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई–निविदा मागवीत आहेत. **निविदा क्रमांक. SUR/L/T/2025/18, तारीख:** २४.१०.२०२५. **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील विविध रेल्वे स्थानकांवर कर्मचारी निवासस्थान आणि सेवा इमारतीचे पुनर्वायरिंग या कामाशी संबंधित विद्युत सामान्य सेवा भाग. **अंदाजे किंमत:** १,४६,२०,५६९.७९. **बोली सुरक्षा:** २,२३,१००/-. **काम पूर्णता कालावधी:** १२ महिने. **ऑफरची वैधता:** ६० दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** २०.११.२०२५ रोजी १५:०० वाजता. बोली सुरक्षा खर्च **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जी), मध्य रेल्वे, सोलापूर**

DE/Sur-69

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
### अभियांत्रिकी कामे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक: ३५–२०२५–एसआरडीईएनसी, तारीख: २०.१०.२०२५. कामाचे नाव:** सोलापूर विभागात आरडीएसओ मान्यताप्राप्त तंत्रज्ञानाचा वापर करून चाकांच्या जळलेल्या भागांचे पुनर्रचना आणि कप्ड वेल्डेड जॉइंट्सचे पुनर्रचना. **कामाची अंदाजे किंमत:** रु.४९,१९,६२०.५६. **बकाया रक्कम:** रु.९८,४००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** ०६ महिने. **देखभाल कालावधी:** शुन्य. www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची **अंतिम तारीख आणि वेळ:** ३१.१०.२०२५ रोजी १५:०० वा. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ३१.१०.२०२५ रोजी १५:३० वा. **संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर**

DE/Sur-65

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
### सिग्नलिंग कामे

डीआरएम (एस अँड टी) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत: **निविदा सूचना क्रमांक: SUR-N-T-2025-26-20, तारीख:** २०.१०.२०२५. **परिसरासह कामाचे नाव:** सोलापूर विभागातील दौंड – कुर्डूवाडी आणि मिरज – लातूर विभागात CTR(P), TRR(P), TSR(P), CTR(S), TBR मॅन्युअली आणि TBR टर्नआउट संबंधित कामे यासारख्या यार्ड सुधारणा/अपग्रेडेशन कामांशी संबंधित सिग्नलिंग कामे. **कामाची अंदाजे किंमत:** रु. ५३,७६,६७०.६२. **निविदा फॉर्मची किंमत:** शुन्य **जमा करावयाची बकाया रक्कम:** रु. १,०७,५००/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १२.११.२०२५ रोजी ३.३० वा. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग III डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov.in** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारली जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक, एस अँड टी शाखा मध्य रेल्वे, सोलापूर**

DE/Sur-66

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



अमेझॉन मध्ये रोबोट्स घेणार: ५ लाख कामगारांची जागा...

## पती पत्नी ..

पती पत्नी नाते शालू  
माणीकप्रेमाचे जडवा  
वाटून घ्यावे सुखदुःख  
तोच खरोखर पाडवा

चुकला पदार्थ जरीही  
तरीही करावी वाहवा  
चव घेता कळे तिला  
करेल तुमची परवा

मुद्दाम कधी कधी रे  
स्वत: स्वतास हरवा  
हरण्यात प्रिये कडूनि  
असतो अद्भुत गारवा

दरवेळी जाळ्या मध्ये  
फसतो कसा गाढवा  
गाढव होण्या मध्येही  
असतो अवीट गोडवा

तीच्याआधी जेवतायं  
कधी तिलाही भरवा  
आनंदाच्या अंगणात  
घुमु लागेल रे पारवा

सुवर्ण क्षण मिळतील  
ढुंढाळत राहता नेरवा  
जुळून ये जीवन गाणे  
छेडत असता मारवा

बोला निर्णय तुझा गं  
रे भले तुम्हीचं ठरवा  
चुकता कुठे काहीही  
सुई स्वताकडे फिरवा



हेमंत मुसरीफ पुणे.  
९७३०३०६९९६.

## SRM E-TENDER NOTICE 1st call

MAHATRANSCO  
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| S.N. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Conversion of SSN to DSN & STN to DTN for lines crossing NH,SH, River, roads of 220kV / 132kV at EHV Lines under EHV O&M Division, Latur. | SE/EHVC/PV/TS/2025-26/T-16 | 7000037859 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:** The Executive Engineer (O): Phone No. (02446)222076.

The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**  
**Superintending Engineer,**  
**EHV (O&M) Circle, Parli-V.**


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

सितारी विमा सेवा केंद्र

दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी

चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.  
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६